अतारांकित प्रश्नोत्तरांची ४३ वी यादी

# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### पालघर जिल्ह्यातील मुंबई-अहमदाबाद या राष्ट्रीय महामार्गावर अग्निशमन दल उभारण्याबाबत

**(१) ७२०३ (१९-०९-२०२५). श्रीमती स्नेहा दुबे (वसई) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गुजरात व उत्तर भारताशी जोडणारा महत्वाचा रस्ता असलेला मुंबई अहमदाबाद या राष्ट्रीय महामार्गावरून दररोज हजारो अवजड वाहनांव्दारे ज्वलनशील पदार्थ व विषारी वायुची वाहतुक केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर जिल्हयातून जाणाऱ्या महत्वाच्या महामार्गावर वसईच्या खानिवडे व डहाणूच्या चारोटी येथील टोलनाक्यावर दररोज कोटयवधींची टोल वसूली होवूनही प्रवाशांच्या जीवन सुरक्षेकरीता कोणतीही उपाययोजना करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या महामार्गावर मागील काळात ट्रकला लागलेली आग, १०२ जणांचा झालेला मृत्यू तसेच डहाणू, चारोटीजवळ केमिकल टँकरला लागलेल्या आगीत रस्त्यावरील ८ जणांचा झालेला दुर्दैवी मृत्यू या घडलेल्या घटना पाहता महामार्गावर अग्निशमन दल किंवा अग्निशमन गाडी नसल्याने अग्निशमन दलाकरीता बोईसर वा डहाणू येथील यंत्रणेवर विसंबून रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन मागील काळात घडलेल्या अपघाताच्या घटना विचारात घेता महामार्गावर अग्निशमन दल उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०४-२०२६) :** (१) होय, खरे आहे.

(२) हे खरे नाही.

कासा पोलीस ठाणे हद्दीत चारोटी टोल नाका आहे.

१) मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ वर अपघात झाल्यास अपघातग्रस्त वाहने, बंद पडलेली वाहने टोईंग करुन बाजूला करणेकरिता १५ टनची क्रेन भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांनी उपलब्ध करुन दिली आहे.

२) अपघात ग्रस्त व्यक्तींना दवाखान्यात घेऊन जाणेकरिता २ ॲम्बुलन्स व स्टाफ उपलब्ध आहे.

३) एक पेट्रोलींग व्हॅन उपलब्ध असून ते स्टाफसह (२४ x ७) तास राष्ट्रीय महामार्गावर पेट्रोलींगसाठी फिरत असतात.

४) राष्ट्रीय महामार्गावर कोणताही अनुचित प्रकार घडू नये याकरिता कासा पोलीस ठाणे स्तरावर दिवस/रात्री करिता डायल-११२ वाहन पोलीस स्टाफसह तसेच बीट अंमलदार असे नेमण्यात येत असतात. ते महामार्गावर पेट्रोलींग करुन घटनेची माहिती देत असल्याने सदर ठिकाणी तात्काळ मदत पोहचविण्यात येते.

(३) व (४) मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ वर मोटार अपघात व वाहनांचे तांत्रिक कारणामुळे

जळीताच्या घटना टाळण्याकरिता मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील खानिवडे टोलनाका/चारोटी टोलनाका/दापचरी जकात नाका दरम्यान कायमस्वरुपी फायरब्रिगेडची व्यवस्था करण्यात यावी याकरिता राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, पी.आय.यु . ठाणे व जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## दिव्यांग विभाग कर्मचाऱ्यांविना अपूर्णच असल्याबाबत

**(२) ७५४३ (१०-१०-२०२५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.रमेश नानासाहेब बोरनारे (सर) (वैजापूर), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **दिव्यांग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत दिव्यागांचा सर्वांगीण विकास करण्याकरिता दिव्यांग कल्याणाची दोन कार्यासने वेगळी करून हा स्वतंत्र विभाग निर्माण करून यामध्ये दिव्यांग वित्त विकास महामंडळ व त्यांची कार्यालये यांचा देखील समावेश करण्यात आला असून दिव्यांग विभाग गेल्या दोन वर्षापासून कर्मचाऱ्यांविना अपूर्णच असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रुपये १९०० कोटी इतक्या निधीची तरतूद असलेला हा विभाग गेली दोन वर्षे कर्मचाऱ्यांविना अपूर्ण असून फक्त आठच अधिकारी चालवत असल्याने अनेक योजना अद्यापपर्यंत कार्यान्वित नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दिव्यांग कल्याण विभागासाठी स्वतंत्र सचिव व अधिकारी कर्मचारी मिळून राज्यात एकूण २ हजार ६३ जागा नव्याने निर्माण करण्यात येणार असल्या तरी ही पदे कधी पर्यंत भरली जाणार आहेत,
(४) असल्यास, जिल्हास्तरीय दिव्यांग सक्षमीकरण कार्यालयांमध्ये नेमलेल्या अधिकाऱ्यांना कार्यवाहीसाठी आवश्यक असलेले अधिकार, कोड्स, सुविधा देण्यात आले आहेत काय तसेच कार्यालयीन व्यवस्थेसाठी दिव्यांगांच्या विशेष शाळांतील अतिरिक्त कर्मचारी तात्पुरते वर्ग करण्याचे आदेश असूनही त्यांची अंमलबजावणी का करण्यात आली नाही,
(५) असल्यास, राज्यात ३० लाखापेक्षा जास्त दिव्यांग व्यक्ती असून दिव्यांगाचे शिक्षण, प्रशिक्षण, पुनर्वसनाच्या योजनांसाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०२-०४-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.

शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १५.१२.२०२२ अन्वये दिव्यांग कल्याण या स्वतंत्र विभागाची निर्मिती करण्यात आली असून, २०६३ पदांना मंजूरी देण्यात आली आहे. दिनांक ०४ जानेवारी, २०२३ व दिनांक १० ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये विभागासाठी एकूण ५६ नियमित पदे व ११ बाह्ययंत्रणेद्वारे घ्यावयाच्या सेवा मंजूर करण्यात आलेले असून, यापैकी ३३ नियमित पदे भरलेली आहेत.

विभागाच्या सद्य:स्थितीत असलेल्या आकृतीबंधाची पुनर्रचना करण्यास मा. मंत्रीमडळाने दिनांक

२६.२.२०२६ रोजी मान्यता दिलेली आहे.

(२) हे खरे नाही.

विभागासाठी एकूण ५६ नियमित पदे व ११ बाह्ययंत्रणेद्वारे घ्यावयाच्या सेवा मंजूर करण्यात आलेले असून, यापैकी ३३ नियमित पदे कार्यरत आहेत.

तसेच आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे कार्यालयासाठी ५४ पदे मंजूर असून, सद्यस्थितीत २८ पदे कार्यरत आहेत.

(३) शासन निर्णय, दिनांक १०.१०.२०२४ अन्वये क्षेत्रीय स्तरावर २०२१ पदे (नियमित १३८१ आणि बाह्ययंत्रणेद्वारे ६४० मनुष्यबळ सेवा) मंजूर केली आहेत.

विभागाच्या आकृतीबंधाची पुनर्रचना करून, नियमित १४०२ व बाहययंत्रणेव्दारे मनुष्यबळ सेवा ६३६ अशा एकूण २१०५ पदांच्या सुधारित आकृतीबंधास मा. मंत्रीमंडळाने दिनांक २६.२.२०२६ रोच्या बैठकीत मान्यता दिली आहे. पुनर्रचना झाल्यानंतर सेवाप्रवेश नियम तयार करून, मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला पाठवून तद्नंतर भरती प्रक्रीया राबविली जाईल.

(४) सर्व जिल्हयातील जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालयांना आहरण व संवितरण क्रमांक (डीडीओ कोड) प्राप्त झाले आहेत.

दिव्यांगांच्या विशेष शाळांतील अतिरिक्त कर्मचाऱ्यांचे समायोजन करण्याबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्रमांक ८९७५/२०१० आणि जनहित याचिका क्रमांक १८८/२०१० दाखल करण्यात आल्या आहेत. सदर प्रकरण मा. उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे.

(५) शासन निर्णय, दिनांक १८.१२.२०२५ नुसार दिव्यांग-अव्यंग विवाह व दिव्यांग-दिव्यांग विवाह योजनेच्या प्रोत्साहन अनुदानात अनुक्रमे (रु.१,५०,०००/-) व (रु.२,५०,०००/-) अशी वाढ करण्यात आली आहे. तसेच शासन निर्णय, दिनांक २८.२.२०२६ अन्वये दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारांकरीता साधनसामग्री (Toolkit) घेण्यासाठी रु.१५,०००/- इतके अर्थसहाय्य मंजूर करण्यात आले आहे. विभागामार्फत दिव्यांगासाठी राबविण्यात येत असलेल्या वैयक्तिक लाभाच्या योजनांमध्ये सुधारणा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वसंतराव नाईक तांडावस्ती सुधार योजनेअंतर्गत रत्नागिरी जिल्ह्याला गेल्या पाच वर्षात निधी उपलब्ध करुन देणेबाबत

**(३) ७६२३ (०७-१०-२०२५). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धनगर समाजाच्या विकासासाठी सुरू केलेल्या वसंतराव नाईक तांडावस्ती सुधार योजनेमधून रत्नागिरी जिल्हयाला गेल्या ५ वर्षात निधी उपलब्ध न झाल्याने या योजनेंतर्गत पाठविलेले विकासकामांचे प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत रत्नागिरी जिल्हयातील किती प्रस्ताव शासनस्तरावर आहेत आणि ते कधीपासून प्रलंबित आहेत,

(३) असल्यास, धनगर समाजाला विकासापासून वंचित ठेवल्याने आंदोलन करण्याचा इशारा महाराणी अहिल्यादेवी समाज प्रबोधन मंचने दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वसंतराव नाईक तांडावस्ती सुधार योजनेमधून रत्नागिरी जिल्हयाला निधी उपलब्ध करुन देण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (१८-०३-२०२६) :** (१), (२), (३) व (४) वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजनेंतर्गत जिल्हास्तरीय समिती, रत्नागिरी यांच्याकडून सन २०२१-२२ ते २०२५-२६ या कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या प्रस्तावांतील ५८९ कामांपैकी रु.२२३५.३९ लक्ष रक्कमेच्या २०० कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पोंभुर्णा (जि.चंद्रपूर) शहरानजिक आदिवासी समाजाचा ध्वज व पुतळा यांची विटंबना झाल्यामुळे आदिवासी बांधवांवर दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घेण्याबाबत**

**(४) ८१०९ (०७-०८-२०२५). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पोंभुर्णा (जि.चंद्रपूर) शहरानजिक आदिवासी समाजाचा ध्वज व पुतळा यांची विटंबना झाल्यामुळे दिनांक १७ ऑक्टोबर, २०२३ रोजी लोकशाही मार्गाने आदिवासी बांधवांनी आंदोलन केले असता, याप्रकरणी १३ आदिवासी बांधवांवर खोट्या तक्रारीच्या आधारे गुन्हे नोंदविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर लोकशाही मार्गाने आंदोलन करणाऱ्या आदिवासी बांधवांवर दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घेण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना दिनांक १२ मार्च, २०२५ रोजी वा त्या दरम्यान लेखी निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.

दिनांक १७ ऑक्टोबर, २०२३ रोजीपासून आंदोलक आरोपी यांनी त्यांच्या मागण्यांकरीता वनपरिक्षेत्र यांचे कार्यालय पोंभुर्णाच्या आवारात ठिय्या आंदोलन करण्याची कोणतीही परवानगी नसताना, गैरकायद्याची मंडळी जमवून आंदोलन केले. फिर्यादीस मारहाण केली व तेथे हजर असलेल्या एस.डी.एम. मॅडम यांना धक्काबुक्की केल्याने गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(२) होय, हे खरे आहे.
(३) मा.लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना सादर केलेले दिनांक १२.०३.२०२५ व दिनांक १३.०३.२०२५ रोजीचे निवेदन शासनाच्या दिनांक १३.०५.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर व पोलीस अधीक्षक, चंद्रपूर यांना पुढील उचित कार्यवाही करण्याकरिता पाठविण्यात आले असून, केलेले कार्यवाहीचा अहवाल शासनास सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

त्यानुषंगाने शासन निर्णय, गृह विभाग, दिनांक २०.०९.२०२२ नुसार दिनांक २६.०६.२०२५ रोजी उपविभागीय अधिकारी, गोंडपिंपरी यांच्या अध्यक्षतेखालील विभागीय समितीने बैठक आयोजित केली असून, उक्त बैठकीत पोलीस ठाणे पोंभुर्णा येथील राजकीय व सामाजिक आंदोलनातील एकूण ७ खटल्यांपैकी ४ खटले निकषात बसत असून, उर्वरित ३ खटले निकषात बसत नसल्यामुळे तसेच गंभीर स्वरुपाचे असल्याने सदर खटले काढून घेणे योग्य होणार नसल्याचे मत उपविभागीय पोलीस अधिकारी, तसेच प्रभारी सहायक संचालक व सरकारी अभियोक्ता, चंद्रपूर यांनी व्यक्त केले आहे.

उक्त विभागीय समितीने शिफारस केलेले खटले काढून घेणेबाबत मा. सदस्य तथा प्रभारी सहायक संचालक व सरकारी अभियोक्ता, चंद्रपूर यांना दिनांक ०९.०७.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे कळविण्यात आल्याचे पोलीस अधीक्षक, चंद्रपूर यांनी दिनांक १८.१०.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## परभणी जिल्ह्यातील वीज वितरण प्रणाली सुधारण्यासाठी सुधारित वितरणक्षेत्र योजनेंतर्गत सुरु असलेली कामे संथगतीने सुरू असल्याबाबत

**(५) ८१४० (१९-०९-२०२५). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यात वीज चोरीचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढल्यामुळे महावितरण कंपनीला मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्ह्यातील वीज वितरण प्रणाली सुधारण्यासाठी दिनांक २१ डिसेंबर, २०२३ रोजी सुधारित वितरण क्षेत्र योजनेंतर्गत २३६ कोटी रुपयांचा निधी देऊन सदरहू कामे २४ महिन्याच्या मुदतीत पूर्ण करण्याबाबतचे कंत्राट संबंधित कंत्राटदाराला देण्यात आलेले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कामे संबंधित कंत्राटदाराकडून अत्यंत संथ गतीने काम सुरु असल्यामुळे नागरीकांना अनियमित वीजपुरवठा आणि तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने वीज वितरण प्रणाली सुधारण्याचे काम विहित मुदतीत पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२६) :** (१) हे अंशतः खरे आहे.

परभणी जिल्ह्यातील वीज चोरी रोखण्याकरिता महावितरण कंपनीमार्फत वेळोवेळी वीज चोरी विरुद्ध मोहीम राबविण्यात येते. त्या अनुषंगाने आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये परभणी जिल्ह्यात एकूण ५६२ वीज चोरी प्रकरणे उघडकीस आणण्यात आली असून सदर प्रकरणांमध्ये रु.३.५६ कोटीचे बिल निर्धारण करण्यात येऊन, रु. १.९२ कोटी वसूल करण्यात आले आहे. तसेच, वीज चोरी प्रकरणी २२ वीज चोरांवर विद्युत कायदा २००३ चे कलम १३५ नुसार पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा (FIR) नोंदविण्यात आला आहे.

(२) हे खरे आहे.

सुधारीत वितरण क्षेत्र योजना अंतर्गत वितरण हानी कमी करण्याकरिता छत्रपती संभाजीनगर शहर मंडळ, हिंगोली मंडळ व परभणी मंडळ या तिन्ही मंडळासाठी एकत्रित असे रु.२३६.७२ कोटीचे कंत्राट मे. पॉलीकॅब इंडीया लिमिटेड यांना दिनांक २१.१२.२०२३ रोजी दिलेले आहे.

यामध्ये परभणी मंडळाअंतर्गत रु.६६.१६ कोटीची कामे समाविष्ट केलेली आहेत. सदरील कंत्राटदार यांनी दिनांक १५.०२.२०२४ रोजी करार करुन परभणी जिल्ह्यात दिनांक २०.१२.२०२४ पासून नेमून दिलेली कामे करण्यास सुरुवात केलेली आहे.

(३) हे अंशतः खरे आहे.

(४) कामाच्या प्रगतीचा महावितरण कंपनीमार्फत मासिक आढावा घेण्यात येतो. त्यानुसार, कामात सुधारणा करण्यासाठी वेळोवेळी कंपनीला नोटीस निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्ह्यातील राज्य परिवहन महामंडळात रिक्त पदे भरुन बस फेऱ्या पूवर्वत सुरु करण्याबाबत

**(६) ८२९० (०६-१०-२०२५). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील राज्य परिवहन महामंडळात वाहक व चालकांची पदे रिक्त असल्यामुळे अनेक भागातील बस फेऱ्या बंद करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य परिवहन चंद्रपूर विभागातील रिक्त पदे भरून बंद करण्यात आलेल्या बस फेऱ्या पूर्ववत सुरू करण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधी, बल्लारपूर यांनी मा. परिवहन मंत्री यांना दिनांक १८.१.२०२५, दिनांक ६.२.२०२५, दिनांक २२.२.२०२५, दिनांक ८.३.२०२५, २१.३.२०२५ रोजी लेखी निवेदने सादर केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (१६-०३-२०२६) :** (१), (२), (३) व (४) दिनांक २१.०५.२०२५ पासून राजूरा-चंद्रपूर-आंबेधानोरा मार्गे पोंभुर्णा ही फेरी राजुरा आगारामार्फत सुरु करण्यात आली आहे व सदर फेरी सुरु केल्याबाबत मा. श्री. सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) विधानसभा सदस्य यांना पत्र क्र. राप/विनि/चंद्र/वाह/चालन/१२६, दिनांक २२.०५.२०२५ अन्वये कळविण्यात आलेले आहे.

रा.प. महामंडळामध्ये वर्ग ३ व वर्ग- ४ घटसंवर्ग संवर्गातील सेवानिवृत्त/स्वेच्छानिवृत्त कर्मचाऱ्यांना सेवा करार पध्दतीने विवक्षित कामकाजासाठी करार तत्वावर घेण्याबाबत कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.०३/२०२५ दिनांक १७.०१.२०२५ अन्वये सुचना प्रसारीत करण्यात आलेल्या असुन जाहिरात प्रसारीत करुन मनुष्यबळ उपलब्ध करुन घेण्याबाबतची कार्यवाही विभागीय स्तरावर सुरु आहे.

रा.प. महामंडळामध्ये बाहय संस्थेकडून कंत्राटी पध्दतीने चालक व सहाय्यक या पदातील मनुष्यबळ उपलब्ध करुन घेण्याबाबत दिनांक ०७.०५.२०२५ रोजीच्या महामंडळ ठराव क्र.२०२५:०५:२९, नुसार रा.प.मध्यवर्ती कार्यालय स्तरावर बाहय संस्थेची निवड करण्याकरीता ई-निविदा प्रसारीत करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.

---

## परभणी येथील सय्यद तुराबुल हक्क दर्गा येथे सुरू असलेल्या अवैध प्रकाराबाबत

**(७) ८४०६ (१९-०९-२०२५). श्री.राजेश विटेकर (पाथरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथील सय्यद तुराबुल हक्क दर्गा येथे सुरू असलेल्या अवैध प्रकाराबाबत अवर सचिव, राज्य अल्पसंख्यांक आयोग, मुंबई यांनी ७ दिवसात कारवाई अहवाल सादर करण्याबाबत चे आदेश पोलिस अधीक्षक परभणी यांना दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सदर प्रकरणी जिल्हा वक्फ अधिकारी यांनी पोलिस निरीक्षक कोतवाली पोलिस स्टेशन, परभणी यांच्याकडे लेखी तक्रार केली असून स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या कार्यालयाकडून पोलिस अधीक्षक परभणी यांना दिनांक २० मे, २०२५ रोजी इमेल द्वारे लेखी तक्रार केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी परभणी पोलीसांनी विहित मुदतीत कार्यवाही केली नसल्याने त्यांची चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींना पाठीशी घालणाऱ्या पोलिस निरीक्षक कोतवाली पोलिस स्टेशन यांच्याविरुद्ध कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०४-२०२६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३), (४) व (५) सदर प्रकरणी पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन कोतवाली यांनी दिनांक ०४/०६/२०२५ रोजी पोलीस स्टेशन कोतवाली येथे चौकशी अधिकारी, जिल्हा वक्फ अधिकारी परभणी तसेच अर्जदार व गैर अर्जदार यांची बैठक घेतलेली आहे. सदर बैठकीमध्ये सर्व मुद्यांवर चर्चा करुन, सदरचे प्रकरण हे दिवाणी स्वरुपाचे असल्याचे निष्पन्न झालेले आहे.

---

**राज्यातील सर्व मोटार परिवहन सीमा चौक्या कायमस्वरूपी बंद करण्यात येणार असल्याबाबत**

**(८) ८४६६ (०७-०८-२०२५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सर्व मोटार परिवहन सीमा चौक्या या कायमस्वरूपी बंद करण्यात येणार असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, परिवहन देखरेखीकरिता आधुनिक कागद विरहित व तंत्रज्ञनाधिष्ठित प्रणालीचा अवलंब करुन त्यांची अंमलबजावणी कधीपर्यंत करण्यात येणार आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (१५-०४-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) सीमा तपासणी नाके बंद झाल्यानंतर याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

**गोल्ला (गोलकर) ही जात भटक्या जमाती 'ब' मधून 'क' वर्गामध्ये समाविष्ट करण्याबाबत**

**(९) ८८२४ (०९-१०-२०२५). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोल्ला (गोलकर) ही जात भटक्या जमाती 'ब' मध्ये समाविष्ट असून त्यांच्या वाटयाला केवळ ०.०५ टक्के पेक्षाही कमी आरक्षण आलेले असून वास्तविक गोल्ला (गोलकर) आणि धनगर या दोन्ही जातीचा मुळ व्यवसाय एकच असुन देवी-देवता व राहणीमान सुध्दा सारखेच आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धनगर ही जात भटक्या जमाती 'क' मध्ये आणि गोल्ला (गोलकर) ही जात चुकीने 'ब' मध्ये समाविष्ट करण्यात आल्याने या जातीवर अन्याय झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गोल्ला (गोलकर) ही जात भटक्या जमाती 'क' मध्ये समाविष्ट करण्याची मागणी केली असून राज्य मागासवर्ग आयोग, पुणे यांच्याकडे दिनांक ७.१०.२०२४ रोजी सुनावणी झालेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गोल्ला (गोलकर) ही जात भटक्या जमाती 'क' मध्ये समाविष्ट करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (१०-०४-२०२६) :** (१) हे खरे नाही.

गोल्ला ही जात दिनांक २९/०५/१९३३ पासून इतर मागास प्रवर्गात समाविष्ट असून दिनांक २१/११/१९६१ च्या शासन निर्णयान्वये गोल्ला या जातीचा भटक्या जमातीच्या यादीत अनु.क्र.९ वर समावेश केलेला आहे. तसेच दिनांक १२/०७/१९७९ रोजीच्या शासन निर्णयान्वये गोल्ला जातीच्या तत्सम जाती म्हणून गोल्लेवार व गोलेर या जातीचा भटक्या जमातीमध्ये समावेश करण्यात आला असून शासन निर्णय दिनांक ०४/०९/१९७९ अन्वये गोल्ला या जातीची तत्सम जात म्हणून गोलकर या जातीचा समावेश करण्यात आलेला आहे. शासन निर्णय दिनांक १७/०१/१९९० अन्वये धनगर ही जात इतर मागासवर्गातून वगळण्यात येऊन तिचा समावेश भटक्या जमातीमध्ये करण्यात आलेला आहे.

शासन निर्णय दिनांक २३/०३/१९९४ अन्वये भटक्या जमाती (ब) प्रवर्गाला २.५ टक्के व भटक्या जमाती (क) प्रवर्गाला ३.५ टक्के आरक्षण देण्यात आलेले आहे.

(२) हे खरे नाही.

गोल्ला ही जात चूकीने भटक्या जमाती (ब) मध्ये समाविष्ट करण्यात आलेली नाही.

(३), (४) व (५) हे खरे आहे.

राज्य मागासवर्ग आयोगाच्या नागपूर उपसमितीने दिनांक ०७/१०/२०२४ रोजी संबंधित समूहाच्या प्रतिनिधींची सुनावणी घेतली आहे. सदर सुनावनीमध्ये अशा प्रकारची मागणी यापूर्वी करण्यात आली होती किंवा कसे, धनगरांबरोबर असलेले संबंध, मागणीच्या अनुषंगाने पुरावे, विहित नमुन्यातील माहिती व आवश्यक ती वाड़मय माहिती आयोगास सादर करण्याबाबत संबंधितास सूचित करण्यात आले आहे. सद्यस्थितीत प्रकरण आयोगाच्या नागपूर उपसमितीच्या विचाराधीन आहे.

---

## राज्यातील अपंगत्व असलेल्या बांधवासाठी सोयीसुविधा पुरविण्याबाबत

**(१०) ८९५९ (१३-१०-२०२५). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), डॉ.विनय विलासराव कोरे (सावकर) (शाहूवाडी), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.राहूल कुल (दौंड), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.देवराव भोंगळे (राजूरा), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.सत्यजित देशमुख (शिराळा), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.उमेश ऊर्फ चंदु यावलकर (मोर्शी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **दिव्यांग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जन्मजात किंवा काही कारणास्तव अपंगत्व आलेल्या बांधवांना आयुष्यात अनेक अडचणींचा सामना करावा लागत असून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कालसुसंगत नवीन योजना, रोजगारासाठी स्वतंत्र धोरण आणि घरकुलांसाठी योजना आणण्याचे निर्देश मा. मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपंगांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविण्यासाठी त्यांना कौशल्य प्रशिक्षण, रोजगार, स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याकरिता व काही बांधवांना अपंगत्वाचे प्रमाणपत्र नसल्यामुळे शासकीय योजना, सवलती, शिक्षण, नोकरी आणि आरोग्यविषयक सुविधा मिळविण्यात अडचणी येत असून यासाठी शासनामार्फत सर्वेक्षण करून त्यांना प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्याकरिता कोणती उपाययोजना व

कार्यवाही करण्यात येणार आहे काय,
(३) असल्यास, लाडकी बहिण योजनेप्रमाणे दिव्यांग लाभार्थ्यांचे अर्थसहाय्य बँक खात्यात जमा करण्यासाठी शासनामार्फत कोणती उपाययोजना करण्यात येणार आहे वा येत आहे काय,
(४) तसेच, देशभरातील ८२ टक्के दिव्यांग व्यक्तींकडे कोणताही प्रकारचा विमा नसून ४२ टक्के दिव्यांगाना केंद्र सरकारची आयुष्मान भारत पंतप्रधान जन आरोग्य योजनेबद्दल माहिती नसल्याचे काही मानवा अधिकारांसाठी लढणाऱ्या संघटनाने केलेल्या राष्ट्रीय सर्वेक्षणात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, राज्यातील दिव्यांग व्यक्तींना विमा, आरोग्याच्या सेवा, विमा कवच देण्यासाठी शासनाकडून कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (१०-०४-२०२६) :** (१) "दिव्यांगांच्या विविध प्रश्नांबाबत" दिनांक ७ एप्रिल, २०२५ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीत मा.मुख्यमंत्री महोदयांनी विषयानुरूप निर्देश दिले आहेत.
(२) दिव्यांग व्यक्तींना वैश्वीक दिव्यांग प्रमाणपत्र (UDID) देण्यासाठी सर्व संबंधित विभाग व अधिकाऱ्यांची बैठक घेऊन सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच, दिव्यांग व्यक्तींचे सर्वेक्षण करण्याच्या प्रस्तावावर कार्यवाही सुरू आहे.
(३) संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत दिव्यांग लाभार्थ्यांचे अर्थसहाय्य DBT द्वारे थेट बँक खात्यात जमा केले जाते. त्याचप्रमाणे विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक लाभाच्या काही सुधारित योजनांमध्ये थेट लाभ हस्तांतरण (DBT) द्वारे थेट नधिी जमा केला जाणार आहे आणि प्रस्तावित सुधारित योजनांमध्येही ऑनलाईन व थेट लाभ हस्तांतरण (DBT) ची कार्यपद्धती वापरली जाणार आहे.
(४) होय, हे खरे आहे, सन २०२५ मध्ये National Centre for Promotion of Employment for Disabled People (NCPEDP) यांनी केलेल्या "Ayushman for all" या सर्वेक्षणात सदर बाब नमुद आहे.
(५) वैश्विक ओळखपत्र (UDID) धारक दिव्यांगांसाठी आयुष्मान कार्ड निर्माण करणे व एकत्रित आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना याबाबतची माहिती देणे यासाठी विशेष मोहिम राबविणेबाबत सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व सर्व आयुक्त महानगरपालिका यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी यांचे स्तरावरून सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वेकोली बल्लारपूर क्षेत्रांतर्गत (ता.राजुरा, जि.चंद्रपूर) व वणी (जि.यवतमाळ) तालुक्यातील कोळसा खाणीमुळे निर्माण झालेल्या विविध समस्याबाबत

**(११) ९०८१ (०७-१०-२०२५). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.संजय देरकर (वणी) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वेकोली बल्लारपूर क्षेत्रांतर्गत (ता.राजुरा, जि.चंद्रपूर) येथे मोठ्या प्रमाणात वेकोलिच्या खुल्या कोळसा खाणी असून गोवरी, माथरा, सास्ती, धोपटाला, पोवनी, गोयेगाव, अंतरा परिसरात दगडी कोळशाचे मुबलक साठे उपलब्ध आहेत, कोळसा उत्खननासाठी खाणी तयार करताना मोठ्या प्रमाणात माती खाणीतून बाहेर काढावी लागते यामुळे वेकोलिने या परिसरात कोळसा खाणीचे ढिगारे निर्माण केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाणीतून निघालेली माती गाव आणि शेतीच्या सीमेवर वाक्लो यामुळे मोठमोठ्या टेकड्या निर्माण झाल्या आहेत. या ढिगाऱ्यावर मानवनिर्मित झुडपी जंगल वाढले असून खोदकामामुळे नद्या-नाल्यांचे प्रवाह बदलल्याने पावसाळ्यात गावांना बॅक वॉटरचा धोका संभवतो, त्याचा दुष्परिणाम शेतीवर होत आहे. तसेच झुडपी जंगलांमुळे वन्यजीवांचा हैदोस वाढून शेतीचे प्रचंड नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, वेकोलिने वणी तालुक्यात (जि.यवतमाळ) अनेक कोळसाखाणी निर्माण केल्या ने तालुक्यात दगडी कोळश्याच्या खाणीतून निघणाऱ्या मातीचे डोंगर ठिकठिकाणी तयार झाले आहेत, त्यामुळे कोळश्याच्या खाणीतून निघणाऱ्या मातीच्या ढिगाऱ्यांनी वेढलेल्या कोलेरा, जुनाड, उकनी व बोरगांव या गावातील शेती निकस झाल्यामुळे उपजीविकेचा प्रश्न निर्माण झाल्याने सदर गावांचे पुनर्वसन करण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांना नुकसान भरपाई व त्यांच्या कुटुंबियांना नोकरीत सामावून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंभूराज देसाई (२७-०२-२०२६) :** (१) व (२) वेकोली बल्लारपूर क्षेत्रांतर्गत येणाऱ्या खुल्या कोळसा खाणीमधील ओबी डंपींग करिता Central Mine Planning and Design Institute (CMPDI) कडून दिलेल्या निर्देशानुसार तसेच कंपनी बोर्डाकडून मिळालेल्या मान्यतेनुसार व खाण सुरक्षा महानिर्देशक यांच्या नियमावलीनुसार खाण परिसरातच करणे कोळसा खाणीतून निघालेल्या मातीचे ओबी डंप तयार केलेले आहेत. असे डंपींग करताना, आवश्यकतेनुसार नाल्याचे प्रवाह बदलण्याकरिता Central Designs Organization, Nashik यांचेकडून डिझाईन घेतल्यानंतर, पाटबंधारे विभाग, चंद्रपूर द्वारा मान्यता घेऊन नाल्याचे प्रवाह बदलण्याचे कार्य केले जाते.आयआयटी, खरगपूर यांच्या अहवालानुसार, खाणीच्या डंपींगमुळे येथील गावांना बॅक वॉटरचा धोका उद्भवत नसल्याचे आढळून आले आहे.तसेच या टेकड्यावर प्रोसोपीसचे जंगल तयार झालेले असल्याने, त्यामध्ये वन्यजीवांचा वावर होत असल्याचे निदर्शनास आलेले असल्याने, वन विभागाच्या सल्ल्यानुसार, वन विभागाच्या वतीने येथील वन्यजीवांचा बंदोबस्त तयार करण्यासाठी अहवाल तयार केलेला असून, या अहवालाची अंमलबजावणी करण्यासाठी वेकोलीकडून वन विभागास रु.९.२८ कोटी इतका निधी दिनांक २१/०१/२०२६ रोजी दिलेला आहे. त्यानुसार वन विभागाकडून पुढील कार्यवाही सुरु आहे.
(३) व (४) हे खरे नाही. वेकोलीच्या खाणक्षेत्रांतर्गत येत असलेल्या कोलेरा व पिंपरी ही गावे पुनर्वसन प्रक्रियेत असून, अहेरी गाव हे बोरगाव येथे पुनर्वसित केले आहे. उकनी गाव खाणक्षेत्रात येत असल्याने, या गावातील जमीनीचे अधिग्रहण पूर्ण झाले आहे, या गावाच्या पुनर्वसनाची पुढील प्रक्रिया सुरु झाली आहे तर जुनाड हे गाव खाणक्षेत्रात येत नाही.वेकोलीच्या वणी तालुक्यातील खुल्या कोळसा खाणीमधील ओबी डंपींग करिता Central Mine Planning and Design Institute (CMPDI) कडून दिलेल्या निर्देशानुसार तसेच कंपनी बोर्डाकडून मिळालेल्या मान्यतेनुसार खाण सुरक्षा महानिर्देशक यांच्या नियमावलीनुसार खाण परिसरातच ओबी डंप तयार केले जातात. त्यामुळे या कोळशाच्या खाणीतून निघालेल्या मातीच्या ढिगाऱ्यामुळे आजूबाजूची निकस होऊन उपजीविकेचा प्रश्न निर्माण झाल्याचे आढळून आलेले नाही. त्यामुळे संबंधीतांना नुकसान भरपाई देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.तथापि, वेकोली वणी नॉर्थ तर्फे एकूण ३९५५.२० हे.आर. इतकी जमीन संपादित केलेली असून, त्यानुसार २२९१ शेतकऱ्यांना २८३.५३ कोटी इतकी नुकसान भरपाई दिलेली असून, या क्षेत्रांतर्गत येत असलेल्या २७३ बाधीत कुटुंबियांना रु.५.०९ कोटी एकमुस्त नुकसान भरपाई दिलेली आहे. तसेच एकूण १४८० स्थानिकांना रोजगार उपलब्ध करुन दिलेला आहे. उकनी गावाच्या पुनर्वसनाचा मोबदला, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पुर्नमोजणीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर देण्यात येणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील पाच विमानतळे पुन्हा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे हस्तांतरित करण्याबाबत

**(१२) ९१०५ (१९-०९-२०२५). श्री.बाबुराव कदम - कोहळीकर (हदगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील नांदेड, लातूर, धाराशिव, यवतमाळ व बारामती ही पाच विमानतळे विकसित करुन त्याचा वापर करण्यासाठी रिलायन्स उद्योगासोबत १५ वर्षांपूर्वी केलेले करार रद्द करुन सदरची पाचही विमानतळ पुन्हा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे हस्तांतरित करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निर्णयाच्याअनुषंगाने अंमलबजावणीची सद्य:स्थिती काय आहे,
(३) असल्यास, नांदेडच्या श्री.गुरु गोविंद सिंग जी विमानतळ येथून मुंबई आणि दिल्लीसाठी विमानसेवा त्वरीत सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०३-२०२६) :** (१) व (२) श्री. गुरू गोविंद सिंग जी नांदेड, लातूर, धाराशिव, यवतमाळ व बारामती या पाच विमानतळाचा रिलायन्स उद्योगासोबत केलेला करार रद्द करून सदर विमानतळे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीकडे हस्तातंरीत केली आहेत. यानुषंगाने श्री. गुरू गोविंद सिंग जी नांदेड विमानतळ हस्तांतरणाबाबत दिनांक ०६.१०.२०२५ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. तसेच लातूर, धाराशिव, यवतमाळ व बारामती विमानतळे हस्तांतरणाबाबत दिनांक ३०.१२.२०२५ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.
(३) श्री.गुरू गोविंद सिंग जी नांदेड, विमानतळावरून मुंबई करिता दिनांक २५.१२.२०२५ पासून हवाईसेवा सुरू केली आहे. तसेच दिल्लीसाठी नांदेड-हिंडन विमानसेवा सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजा मुळावा (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) येथे ५ एम.व्ही.ए चे अतिरिक्त रोहित्र उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१३) ९१६८ (०७-०८-२०२५). श्री.किसन वानखेडे (उमरखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजा मुळावा (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) येथे ५ एम.व्ही.ए चे अतिरिक्त रोहित्र उपलब्ध करुन देणेबाबत उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दिनांक १२.३.२०२५ रोजीच्या सुमारास अध्यक्ष तथा व्यवस्थापकिय संचालक, महावितरण कंपनी मर्या., प्रकाशगड, वांद्रे–पूर्व, मुंबई यांना अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार सदरील अहवाल सादर करण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, या अहवालानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०३-२०२६) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) मौजा मुळावा (ता. उमरखेड, जि. यवतमाळ) येथील ३३/११ के. व्ही. उपकेंद्रामध्ये सद्यास्थितीत १x५ एम.व्ही.ए. चे रोहित्र कार्यान्वित असुन, RDSS विद्युत प्रणालीचे आधुनिकीकरण आणि सक्षमीकरण योजनेअंतर्गत या उपकेंद्रामध्ये एक अतिरिक्त ०५ एम.व्ही.ए. चे रोहित्र प्रस्तावित करण्यात आलेले आहे. "वितरण प्रणालीचे आधुनिकीकरण आणि सक्षमीकरण" चा प्रस्तावास केंद्र शासनाची मंजुरी प्राप्त करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यपरिवहन महामंडळात नवीन कर्मचारी भरतीसंदर्भात

**(१४) ९२६० (०६-१०-२०२५). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळात पंचवार्षिक योजनेनुसार २५ हजार बसगाडयांच्या खरेदीस मंजुरी देण्यात आल्याचे तसेच महामंडळाने त्यादृष्टीने एसटीमध्ये चालक, वाहक, अभियंता पदासाठी भरती करण्याच्या प्रक्रियेला महामंडळाच्या संचालक मंडळाने मंजुरी दिली असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एसटीची सध्याची आर्थिक परिस्थिती पाहता मा.उच्च न्यायालयाने नोकरभरतीला सन २०२४ पर्यत मनाई केली होती येत्या काही वर्षात एसटीतून निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या अधिक असुन येत्या पाच वर्षात नव्या २५ हजार बसगाडया ताफ्यात दाखल होणार असल्याने नविन मुनष्यबळाची आवश्यकता भासणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (१७-०३-२०२६) :** (१), (२), (३) व (४) रा. प. महामंडळाच्या संचालक मंडळाने दिनांक ०७.०५.२०२५ रोजीच्या महामंडळ ठरावान्वये रा. प. महामंडळाच्या वाहन ताफ्यात सन २०२५-२६ पासून सन २०२९-३० पर्यंत दरवर्षी ५००० नवीन वाहने समाविष्ट करण्यास व बाह्य संस्थेकडून कंत्राटी पद्धतीने चालक व सहाय्यक या पदातील मनुष्यबळ उपलब्ध करून घेण्याबाबत मंजुरी देण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत रा. प. महामंडळामध्ये बाह्य संस्थेकडून कंत्राटी पद्धतीने चालक व सहाय्यक या पदातील मनुष्यबळ उपलब्ध करून घेण्याबाबत रा. प. मध्यवर्ती कार्यालय स्तरावर बाह्य संस्थेची निवड करण्याकरीता ई- निविदा प्रक्रिया राबविण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

---

## ठाणे जिल्ह्यातील सर्वसामान्य वीजग्राहकांसह उद्योजकांना मे. टोरंट पॉवर लि. कंपनी त्रास देत असल्याबाबत

**(१५) ९३४३ (१९-०९-२०२५). श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.हारुन खान (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळवा, मुंब्रा व दिवा (जि.ठाणे) येथे सर्वसामान्य वीजग्राहकांसह उद्योजकांना मे. टोरंट पॉवर लिमिटेड कंपनीने वेठीस धरले असून अतिरिक्त रक्कमेची देयके देणे, कधीही वीजपुरवठा खंडीत करणे तसेच थकबाकीसाठी

तगादा लावणे इत्यादी प्रकारांमुळे नागरिक त्रस्त झाले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वीज कंपनीच्या गैरव्यवहाराने नागरिक त्रस्त झाल्याने सदर कंपनीला हद्पार करण्यात यावे, अशी मागणी जनसामान्य नागरिक, सेवाभावी संस्था, लोकप्रतिनिधी यांच्यामार्फत करण्यात आली असतांना देखील अद्यापपर्यंत त्यांच्याविरुद्ध कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही,

तथापि, अतिरिक्त रकमेची वीजदेयके देण्यात येतात व वीजपुरवठा खंडीत होणे अशा आशयाचे वृत्त दैनिक वृत्तपत्रामध्ये माहे मे २०२५ मध्ये प्रकाशित झाले होते.

(२) हे खरे नाही,

मा. महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाच्या बहुवार्षिक वीजदर आदेशानुसार वीजदर निश्चित केले जातात. संबंधित वीजदर हे महाराष्ट्रातील सर्व वीज ग्राहकांसाठी सारखेच असून, वीजग्राहकांच्या वर्गवारीनुसार आकारले जातात. महावितरणच्या ग्राहकास लागू असलेल्या दराप्रमाणेच आणि प्रत्यक्ष वीज वापर व मीटर वाचनाप्रमाणेच, मे. टोरंट पॉवर लिमीटेड मार्फत शिळ, मुंब्रा व कळवा वितरण फ्रॅन्चाइझी विभागातील सर्व ग्राहकांना वीज देयके दिली जातात. यापूर्वी शिळ, मुंब्रा व कळवा वितरण फ्रॅन्चाइझी विभागातील ग्राहकांच्या वीज देयकातील अनियमितता तपासण्याकरीता त्रिसदस्यीय उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीच्या निष्कर्षानुसार शिळ, मुंब्रा व कळवा वितरण फ्रॅन्चाइझी विभागातील वर्गवारीच्या वीज ग्राहकांची वीज बिले मा. महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने ठरविलेल्या दरानुसार आकारण्यात असल्याचे दिसून आले व त्यात कोणत्याही प्रकारची अनियमितता आढळून आलेली नाही. महावितरणच्या ग्राहकास लागु असलेल्या दराप्रमाणेच शिळ, मुंब्रा व कळवा वितरण फ्रॅन्चाइझी विभागातील सर्व ग्राहकांना वीज देयके दिली जातात.

मे.टोरंट पॉवर लि. मार्फत शिळ, मुंब्रा, कळवा या वितरण फ्रॅन्चाइझी विभागात रु. ३१० कोटी इतकी गुंतवणुक करण्यात आली आहे. वीज वितरणहानी कमी करण्याच्या दृष्टीने व जीर्ण वीज वितरण प्रणालीमध्ये सुधारणा करण्यासाठी मे.टोरंट पॉवर लि. कडून नविन रोहित्रे बसविणे, रोहित्रांची क्षमता वाढविणे, भूमिगत केबल टाकणे इत्यादी कामे हाती घेतली जातात. संबंधीत कामे करताना आणि वीज वितरण प्रणालीच्या दुरुस्तीसाठी आवश्यकतेनुसार मे. टोरंट पॉवर लि., कडून वीज पुरवठा खंडीत केला जातो व त्यावेळी संबंधीत क्षेत्रातील वीजग्राहकांना त्यांच्या मदत मोबाईल क्रमांकावर पूर्वसूचना देण्यात येते. मे. टोरंट पॉवर लि. मार्फत शिळ, मुंब्रा व कळवा वितरण फ्रॅन्चाइझी विभागातील विहित वेळेत वीजदेयके न भरणा वीजग्राहकांवर विद्युत अधिनियम २००३ चे कलम ५६ नुसार आणि मा. महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग (वीज पुरवठा संहिता आणि पुरवठ्याच्या इतर अटी) नियम, २०२१ चे नियम या तरतुदीनुसार कार्यवाही केली जाते. त्यामध्ये दिलेल्या मार्गदर्शक तत्वांचे पालन करून थकबाकी असलेल्या ग्राहकांना नोटीस देऊन विहित वेळेत वीजबिल न भरलेल्या वीजग्राहकांचा वीजपुरवठा खंडित करण्यात येतो.

पायाभूत सुविधा उभारणीसाठी आणि वीज वितरण प्रणालीच्या दुरुस्तीसाठी आवश्यकतेनुसार विद्युत ग्राहकांना त्यांच्या नोंदणीकृत भ्रमणध्वनी क्रमांकावर पूर्व सूचना देऊन वीज पुरवठा तात्पुरत्या स्वरुपात खंडीत करण्यात येतो.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राष्ट्रतेज अटल कामगार सहकारी गृहनिर्माण सहकारी संस्था मर्यादित, सोलापूर या संस्थेतील लाभार्थ्यांना वीज जोडणी मिळण्याबाबत

**(१६) ९३९५ (१९-०९-२०२५). श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत फिडर पिलर ते मीटर पर्यंतचे काम रु.५००/- इतका मोबदला घेऊन, जसे रे नगर फेडरेशन, कुंभारी येथील सभासदांना लाभ मिळवून दिला, त्याच धर्तीवर राष्ट्रतेज अटल कामगार सहकारी गृहनिर्माण सहकारी संस्था मर्यादित, सोलापूर या संस्थेतील लाभार्थ्यांना रु.५००/- इतका मोबदला घेऊन वीज जोडणी मिळण्याकरिता शासनाकडे दिनांक ७ मार्च, २०२५ रोजी पत्र प्राप्त झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) प्रधानमंत्री आवास योजना (शहरी), कुंभारी या गृहनिर्माण प्रकल्पास RDSS-PMAY योजनेव्दारे केंद्र शासनाने अनुदान प्राप्त असल्याने अर्जदारांकडून केवळ प्रक्रिया शुल्क आणि सुरक्षा ठेव भरुन घेण्यात आली आहे. राष्ट्रतेज अटल कामगार सहकारी गृहनिर्माण संस्था मयादित, दहिटणे, उत्तर सोलापुर या गृहनिर्माण संस्थेस केंद्र शासनाचे अनुदान प्राप्त नसल्याने या गृहनिर्माण संस्थेचा वीज पुरवठा RDSS-PMAY योजनेमध्ये अंतर्भूत करता आला नाही. येथील घरकुलांना नवीन सेवा जोडणी (NSC) योजनेद्वारेच वीज पुरवठा मंजुर करण्यात आला आहे. नवीन सेवा जोडणी (NSC) योजनेकरीता महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाद्वारे (MERC) निश्चित करण्यात आलेल्या नियमाप्रमाणे अर्जदारांकडून सेवा जोडणी शुल्क, प्रक्रिया शुल्क आणि सुरक्षा यांची मागणी करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

## पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) प्रादेशिक परिवहन कार्यालयातील अपुऱ्या सुविधांबाबत

**(१७) ९४३६ (०६-१०-२०२५). श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या दर्जात वाढ करून जुन्नर, आंबेगाव, पिंपरी-चिंचवड, मावळ व खेड यांचा उप प्रादेशिक कार्यालयाचा माहे जुलै, २०२३ च्या निर्णयानुसार समावेश करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणच्या दर्जात वाढ करूनही अनेक मंजूर पदे रिक्त असल्याने अधिकाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा ताण वाढल्याने नागरिकांना सोयी-सुविधा देण्यास अडचणी निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच नवीन प्रादेशिक कार्यालय स्थापन करण्यात आल्यानंतरही नागरिकांना डी डी व रकमेचा भरणा करताना उपप्रादेशिक परिवहन डीआरटीओ १४ नावाने व्यवहार करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तक्रार करण्यासाठी जुन्याच ई मेल आयडी चा वापर केला जात आहे व नवीन ट्रॅक अद्यावत तपासणी केंद्र व अधिकाऱ्यांकरिता सुसज्ज इमारत बांधण्याकरिता कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (१५-०४-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.

शासन निर्णय क्र.एमव्हीडी-१०२२/ प्र.क्र.२४३ /परि-४, दिनांक २३ जून २०२३ नुसार उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी चिंचवडच्या दर्जामध्ये वाढ करुन सदर कार्यालयाचे प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये रुपांतर करण्यात आले आहे. तथापि सदर कार्यालयामध्ये नव्याने कोणतेही तालुके समाविष्ट करण्यात आलेले नाहीत.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४), (५) व (६) नागरिकांद्वारे तक्रार करण्यासाठी १८०० १२० ८०४० (टोल फ्री) व आपले सरकार तक्रार निवारण प्रणाली उपलब्ध असून ते सदर कार्यालयाच्या dyrto.१४-mh@gov.in या ईमेल आयडीवर सुध्दा तक्रार करु शकतात.

तसेच पिंपरी-चिंचवड कार्यालयाकरिता सुसज्ज इमारत असून अद्यावत वाहन तपासणी केंद्राचे काम अंतिम टप्प्यात आहे.

---

## नवापूर (जि. नंदुरबार) तालुक्यामध्ये विजपुरवठा नियमीत करण्यासह कमी-जास्त दाबाच्या विजपुरवठा पूर्ववत करण्याबाबत

**(१८) ९४७४ (१९-०९-२०२५). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवापूर (जि. नंदुरबार) तालुक्यामधे वारंवार विजपुरवठा खंडित होत असून, कमी-जास्त दाबाच्या विजपुरवठ्यामुळे नागरीकांच्या घरातील टि.व्ही., फ्रिज, पंखे इ. उपकरणांचे नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सरासरी वीज देयके, सदोष मीटरमुळे नागरीकांना जास्तीची विज देयके येत असल्याने निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्याअनुषंगाने विजपुरवठा नियमीत करण्यासह कमी-जास्त दाबाच्या विजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही.

नवापूर (जि. नंदुरबार) तालुक्यामध्ये कमी-जास्त दाबाच्या वीजपुरवठ्यामुळे नागरिकांच्या घरातील टि.व्ही., फ्रीज, पंखे इ. उपकरणांचे नुकसान होत असल्याबाबतची कोणतीही तक्रार महावितरण कंपनीच्या नवापूर उपविभाग, कार्यालयात प्राप्त झाल्याचे आढळून आली नाही.

(२) हे खरे नाही.

मीटर चालू परिस्थितीत असल्यास रिडिंगनुसार वीज देयके दिली जातात. परंतू मीटर नादुरुस्त असल्यास मा. महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाच्या निर्देशानुसार मागील सरासरी वीज वापरानुसार वीज देयके आकारण्यात येतात.

(३) महावितरण कंपनीच्या नवापूर उपविभागाअंतर्गत ३३/११ केव्ही खांडबारा, नवापूर, नवापूर एम आय डी सी, विसरवाडी, खातगाव,रायपूर अशा एकूण ०७ उपकेंद्रात कॅपेसिटर बँक हे प्रतिक्रियाशील ऊर्जा व्यवस्थापन योजना भाग ब योजनेअंतर्गत बसविण्यात आलेले आहेत. यामुळे योग्य दाबाचा वीजपुरवठा ग्राहकांना करण्यात येतो. तसेच संबंधित पसिरातील ग्राहकांना अखंडित व गुणवत्तापूर्वक वीजपुरवठा महावितरण कंपनीमार्फत करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

## शिरपूर (ता.वणी, जि.यवतमाळ) येथे सुधारित वितरण क्षेत्र योजनेतून विद्युत उपकेंद्राचे काम सुरु करण्याबाबत

**(१९) ९७४३ (१९-०९-२०२५). श्री.संजय देरकर (वणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरपूर (ता.वणी, जि.यवतमाळ) येथील गत दोन वर्षापासून सुधारित वितरण क्षेत्र योजनेतून (Revamped Distribution Sector Scheme) मंजूर असलेल्या विद्युत उपकेंद्राचे काम अद्यापही सुरु करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत वीज पुरवठा वारंवार खंडीत होत असल्यामुळे परिसरातील वीज ग्राहकांना गैरसोईला सामोरे जावे लागत असल्यामुळे शिरपूर विद्युत उपकेंद्र तात्काळ सुरु करण्यात यावे अशी मागणी माजी जिल्हा परिषद सदस्य यांचेकडून संबंधित अधिकाऱ्यांकडे दिनांक ३० एप्रिल, २०२५ रोजी प्रत्यक्ष भेटून लेखी निवेदनाव्दारे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीच्या अनुषंगाने शिरपूर विद्युत उपकेंद्र तात्काळ सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

माजी जिल्हा परिषद सदस्य यांचेकडून दिनांक२९.०४.२०२५ रोजी निवेदन प्राप्त झाले आहे.

(३) शिरपूर (ता. वणी, जि. यवतमाळ) हे उपकेंद्र सुधारित वितरण क्षेत्र योजनेतून (Revamped Distribution Sector Scheme - System Strengthening and Modernization) अंतर्गत प्रस्तावित असून, सदर प्रस्ताव केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी प्रलंबित आहे. प्रस्तावास मंजुरी प्राप्त झाल्यावर सदरचे काम पूर्ण करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

## सोलापूर जिल्ह्यात प्रादेशिक परिवहन कार्यालयातील काही कर्मचारी गैरव्यहार करीत असल्याबाबत

**(२०) ९७६७ (०६-१०-२०२५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यात प्रादेशिक परिवहन कार्यालयातील काही कर्मचारी कृषी मालवाहतूक करणाऱ्या वाहनधारक शेतकऱ्यांकडून दर महिन्याला हप्ता वसूल करत असल्याची तक्रार लोकप्रतिनिधींनी पालकमंत्र्यांकडे केली असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लिंबू उत्पादक शेतकऱ्याला तब्बल २६ हजार रुपयांचा दंड केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन तक्रारीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (२३-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) मोटार वाहन निरीक्षकांच्या रोड चेकिंग डायरी (RCD) तपासली असता, ०४ वाहने कृषी मालाने ओव्हरलोड वाहतूक करीत असल्याचे आढळून आल्याने मोटार वाहन कायद्यान्वये कारवाई करण्यात आली आहे. कारवाई करण्यात आलेल्या ०२ मालवाहू वाहनास मोटार वाहन कायद्यान्वये रुपये २६,०००/- इतका दंड ई-चलनाद्वारे आकारण्यात आला आहे.

प्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर कार्यालयाच्या वायुवेग पथकाद्वारे दिनांक ०१ मे, २०२५ ते दिनांक ११ मे, २०२५ पर्यंत मोटार वाहन कायद्याचा भंग करण्यात आलेल्या एकूण १७७ हलक्या मालवाहू वाहनांवर रुपये ३१,०७,०००/- इतका दंड आकारण्यात आलेला आहे.

शासन निर्णय क्र. एमव्हीडी – १२०८ / प्र. क्र. १६ / परि-४, दिनांक २५.०३.२००८ नुसार प्रपत्र – क्र-(१) मध्ये शेती कामाशी संबंधित वाहने उदा. ट्रॅक्टर, ट्रॉली यांना सीमा तपासणी नाक्यांवरील कर वसूलीतून वगळण्यात आले आहे. केंद्र शासनाच्या दिनांक ०७.०१.२०१६ रोजीच्या अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा १९८८ च्या कलम ११३ (३) ची अंमलबजावणी करीत असताना निर्धारीत वजनक्षमतेच्या ५ टक्के इतकी सुट परिवहन वाहनांना देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आटपाडी (जि. सांगली) तालुक्यातील गावामध्ये शेतातील कृषिपंपाचा विद्युत पुरवठा खंडित होत असल्याबाबत

**(२१) १०१९८ (०८-०९-२०२५). श्री.सुहास बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आटपाडी (जि.सांगली) तालुक्यातील शेटफळे, करगणी परिसरातील गावामध्ये शेतातील कृषिपंपाचा विद्युत पुरवठा वारंवार खंडित होत असल्याने डाळींब व इतर फळ पिकांसह भाजीपाला पिकांचे नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषिपंपाचा विद्युत पुरवठा वारंवार खंडीत होत असल्याने लाखो रुपयांच्या पेरलेल्या पिकांना सिंचन सुरळीत होत नसून तसेच योग्य दाबाने वीज पुरवठा होत नसल्याने शेतकऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी करुन तातडीने कृषिपंपांना विद्युत पुरवठा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही.

सांगली जिल्ह्यातील आटपाडी तालुक्यातील शेटफळे, करगणी परिसरातील शेतकऱ्यांना ३३/११ केव्ही करगणी उपकेंद्रामधील हिवतड, शेटफळे, गोमेवाडी, वनपुरी या वीज वाहिनीवरुन वीजपुरवठा केला जात होता. सद्यस्थितीमध्ये शेटफळे येथे ३३/११ केव्ही ५ एमव्हीए क्षमतेचे नवीन उपकेंद्राचे काम पूर्ण होऊन, सदर उपकेंद्र सुरु झाले आहे. त्यामुळे शेटफळे व करगणी परिसरातील विद्युत पुरवठा सुरळीतपणे चालू आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खानापूर व आटपाडी (जि.सांगली) तालुक्यात रोहित्रांची कामे करण्याबाबत

**(२२) १०२०७ (१९-०९-२०२५). श्री.सुहास बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खानापूर (जि.सांगली) मतदारसंघामध्ये वीजेच्या अनेक समस्या असून पुरेशा दाबाने शेतकऱ्यांना वीज पुरवठा होत नसून दिवसाला फक्त ६ तास वीज पुरवठा होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गावांमधील रोहित्रे वारंवार जळणे, तारा तुटणे अशा घटना घडत असल्याने ऊस, डाळींब, फळबागा यांसह इतर पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी खानापूर व आटपाडी तालुक्यात नवीन ३३/११/ के.व्ही. सबस्टेशन / निरंतर योजनेतून वाढीव रोहित्रे इ. कामे करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.

सर्व शेतीपंप ग्राहकांना चक्राकार पध्दतीने योग्य दाबाने व आठ तास वीज पुरवठा करण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

नादुरुस्त रोहित्रे तातडीने बदलण्यासाठी एकूण २५ वितरण रोहित्रांचा साठा उपलब्ध आहे. तसेच नादुरुस्त रोहित्रे तातडीने दुरुस्त करणेसाठी सन २०२५-२६ या वर्षात महावितरण मार्फत विटा विभागासाठी रोहित्रे दुरुस्त करणाऱ्या ७ एजन्सींना LOE देण्यात आले आहेत. निरंतर वीज योजनेअंतर्गत विटा विभागामध्ये ५५ इतके रोहित्रे बदली केले आहेत. प्रतिबंधात्मक देखभाल दुरुस्ती अंतर्गत स्पेसर्स बसविणे, वितरण पेटी बदलणे, उपरी तारा काढणे तसेच रोहित्र देखभाल व दुरुस्तीची कामे केली आहेत त्यामुळे रोहित्र जळाल्यानंतर विद्युत पुरवठा खंडित होण्याचे प्रमाण कमी झालेले आहे. रोहित्रे नादुरुस्त झाले नंतर तात्काळ बदलण्यात येतात.

(३) हे खरे आहे.

(४) आटपाडी व खानापुर तालुक्यामध्ये DPDC आणि AG Policy योजनेअंतर्गत १०५४ नवीन रोहित्रांचे काम पूर्ण झाले आहे. कृषी धोरण २०२० अंतर्गत घर्णिकी, भिकवडी, वाझर येथे नवीन उपकेंद्र पूर्ण झाले असून शेटफळे, हिवतड, दिपंची येथे नवीन उपकेंद्रांची कामे प्रगतीपथावर आहेत. शिवनी, लिगीवरे येथील उपकेंद्रांमध्ये रोहित्र क्षमतावाढीचे काम पूर्ण झालेले आहे. MSKVY २.० व RDSS या योजनेअंतर्गत निंबवडे, विठ्ठलापूर, हिंगणगादे, उवळेश्वर व बेनापूर येथे नवीन उपकेंद्रांचे काम तसेच खरसुंडी, लेंगरे उपकेंद्रांमध्ये रोहित्र क्षमतावाढीचे काम प्रगतीपथावर आहे. MSKVY २.० क्षमतावाढ योजनेअंतर्गत गाडी येथे उपकेंद्र क्षमतावाढीचे काम पूर्ण झालेले असून माडगुळे येथे प्रस्तावित आहेत.

याव्यतिरिक्त ADB या योजनेअंतर्गत आटपाडी (मापटे मळा), पिंपरी (खु.), माहुली, साळशिंगे, बामणी व भांबर्डे येथे नवीन उपकेंद्र, पुजारवाडी, आटपाडी, करगणी, नागेवाडी, विटा सिटी, आळसंद, भाळवणी उपकेंद्रांमध्ये रोहित्र क्षमतावाढीचे काम प्रस्तावित आहे. तसेच आटपाडी तालुक्यात लिंगीवरे व माडगुळे येथे मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत सोलर प्लॅंट उभारल्याने शेतकऱ्यांना दिवसा विजपुरवठा सुरळीत व योग्य दाबाने होत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बोईसर (जि.पालघर) आदिवासी भागासह ग्रामीण भागात कमी दाबाने वीज पुरवठा होत असल्याने उपकेंद्र सुरू करण्याबाबत

**(२३) १०६१२ (१९-०९-२०२५). श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोईसर (जि.पालघर) आदिवासी भागासह ग्रामीण भागातील वाडी, वस्ती, पाड्यांमध्ये कमी दाबाने होणारा वीज पुरवठा, वीज पुरवठा करत असताना निर्माण होणाऱ्या तांत्रिक अडचणी, ट्रान्सफार्मर मध्ये होणारे बिघाड, वीज पुरवठा लोड शेडिंग आणि वीज पुरवठा सुरू करण्यासाठी दुरुस्ती कामात होणारा विलंब आणि पावसाळा पूर्वी तयारी करण्याच्या लेखी सूचना स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार महावितरण विभागास निदर्शनास आणून दिल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर प्रकरणी २२ गावे, १०० पेक्षा अधिक पाड्यांचा सहभाग असलेल्या मौजे ढेकाळे फिडरच्या वीज वाहिन्यांची लांबी सुमारे ६० कि.मी. पेक्षा अधिक असून ११ किलोवॅट भार क्षमतेच्या मुख्य वाहिनीला आठ ते दहा टॅब लाईन असल्यामुळे पावसाळ्यात मोठ्या संख्येने बिघाड निर्माण होऊन वीज पुरवठा वारंवार खंडित होत असल्याने तसेच फीडरची लांबी अधिक असल्याने दोष शोधण्यात महावितरणाच्या कर्मचाऱ्यांचा वेळ खर्च होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी मौजे ढेकळे येथे उपकेंद्र मंजूर असून उपकेंद्र उभारण्यासाठी पाटबंधारे विभागाच्या मालकीची एक एकर जागा पाटबंधारे विभागाकडून उपलब्ध होण्यास तांत्रिक अडचणी येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन २२ गावे व १०० पाडे यांना सुरळीत व अखंडित वीज पुरवठा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने ढेकळे येथे उपकेंद्र सुरु करण्याकरीता उक्त तांत्रिक अडचणी सोडविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही.

बोईसर विभागाअंतर्गत येत असलेल्या ३३ केव्ही डेकाळे उच्चदाब वाहिनी यांचे पावसाळयापूर्वी देखभाल व दुरुस्तीसाठी करावयाची कामे महावितरण कंपनीमार्फत हाती घेण्यात आली होती. सदर कामांमध्ये वाहिनीच्या जवळ असलेल्या झाडाच्या फांद्या छाटणे, गंजलेले पोल बदलविणे, खराब झालेले पिन इन्सुलेटर व डिस्क इन्सुलेटर बदलविणे, कट पोईट जम्परला टाईट करणे इत्यादी कामे करण्यात येत होती. दिनांक १९.०५.२०२५ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधी यांना मान्सून पूर्व करण्यात येत असलेल्या कामांची माहिती अवगत करुन देण्यात आली होती.

(२) हे अंशतः खरे आहे.

सदर वीज वाहिनी ही घनदाट जंगलातून जात असल्यामुळे पावसाळयात किंवा वादळी वाऱ्यामुळे काही वेळेस वीज वाहिनीवर बिघाड निर्माण होतो परंतु सदर बिघाडाची तात्काळ दुरुस्ती करुन वीजपुरवठा सुरळीत करण्यात येतो.

(३) हे अंशतः खरे आहे.

सदर प्रकरणी सुधारीत वितरण क्षेत्र योजना (RDSS Modernization) अंतर्गत प्रस्तावित ३३/११ केव्ही सातिवली / ढेकाळे उपकेंद्राला जागा देण्यास पाटबंधारे विभाग, पालघर यांनी मंजूरी दिली आहे. परंतु, त्यासाठी त्यांनी वार्षिक रु.१६.५७ लाख इतक्या भाडेपट्ट्याची मागणी केली आहे. सदर उपकेंद्र ग्राहकांना दर्जेदार

व अखंडित वीजपुरवठा करण्यासाठी केंद्र शासनाच्या लोकाभिमुख योजनेमध्ये प्रस्तावित असल्याच्या कारणास्तव महावितरण कंपनीने सदर भाडेपट्ट्याच्या रक्कमेची पुर्नविचार करण्यासाठी पाटबंधारे विभागाला दिनांक ०४.०६.२०२५ रोजी कळविले आहे.

(४) सुधारीत वितरण क्षेत्र योजना (RDSS Modernization & System Strenghening) अंतर्गत RDSS Scheme Modernization मध्ये ८०५.३३ कोटींची कामे प्रस्तावित केलेली आहेत. सदर योजनेअंतर्गत नवीन ११ उपकेंद्र प्रस्तावित केले असून, एकूण १६ उपकेंद्रात ५ एमव्हीए ते १० एमव्हीए Power Transformer Augmentation प्रस्तावित केले आहे. RDSS Modernization या योजनेअंतर्गत ३३/११ केव्ही सातिवली /ढेकाळे उपकेंद्र प्रस्तावित करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना विद्युत जोडणी त्वरीत करुन देण्याबाबत

**(२४) ११०३१ (१९-०९-२०२५). श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी सौर ऊर्जेच्या ऐवजी पारंपरिक विद्युत जोडणी मिळण्यासाठी संबंधित वीज वितरण विभागाकडे अर्ज केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्ह्यातील सोलार पंपव्यवस्थेमध्ये अनेक अडचणी येत असून, विशेषतः वन्य प्राण्यांमुळे सोलार उपकरणांचे नुकसान होते तसेच नियमित देखभाल करणे ग्रामीण भागात अवघड जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच मौजे वरोरा (जि.चंद्रपूर) येथील गावात तारा व पोल दुरुस्तीची कामे केली नसल्याने व ऊर्जा विभागाच्या अनागोंदी कारभारामुळे वारंवार शेतकऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे त्यामुळे खरीप हंगामापुर्वी वीज जोडणीची कामे करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त जिल्ह्यातील अशा शेतकऱ्यांना सौरऊर्जा ऐवजी विद्युत वितरण व्यवस्था उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशतः खरे आहे.

आस्थापित करण्यात आलेल्या सौर प्लेट अथवा इतर साहित्याची कोणत्याही वन्यप्राण्याने नुकसान केल्यास त्याचा वनविभागाकडुन पंचनामा करण्यात येतो व सदर सौर प्लेट व इतर साहित्याचा विमा काढलेला असल्यामुळे त्वरीत सौर प्लेट व इतर साहित्य बदलवुन देण्यात येत आहेत.

(३) हे अंशतः खरे आहे.

माहे मे, २०२५ मध्ये झालेल्या वादळामुळे मौजा वरोरा (जि. चंद्रपूर) येथील उच्चदाब वाहिनी व लघुदाब वाहिनीचे बऱ्याच प्रमाणात नुकसान झालेले आहे. माहे मे, २०२५ मध्ये झालेल्या वादळामुळे उच्चदाब वाहिनीचे ३२ पोल आणि लघुदाब वाहिनीचे १०८ पोल पडलेले होते. तसेच काही ठिकाणी वीज वाहिनीच्या तारा तुटलेल्या होत्या. सर्व तुटलेल्या तारा व पडलेले पोल उभारुन वीज पुरवठा दिनांक २०.६.२०२५ रोजी पूर्ववत सुरु करण्यात आलेला आहे.

(४) महाराष्ट्र शासनाच्या कृषिपंप वीज जोडणी धोरणानुसार शेतकऱ्यांना पारंपारीक पध्दतीने वीज पुरवठ्याऐवजी सौर कृषीपंप आस्थापित करुन देण्यात येत आहे. इच्छुक शेतकऱ्यांना सौर कृषीपंपाव्दारे मागेल त्याला सौरकृषीपंप योजने अंतर्गत सौरपंपाची जोडणी सर्वसाधारण अर्जदारांकरीता १०% व अनुसूचित जाती व जमातीकरीता ५% रक्कम भरून जोडणी देण्यात येत आहे.

"मागेल त्याला सौर कृषी पंप" योजनेचा लाभ जास्तीत जास्त कृषी ग्राहकांनी नवीन सौर पंप वीज जोडणीद्वारे घ्यावा यासाठी कृषी ग्राहकांना प्रोत्साहित करण्यात येत आहे. सौर पंपासाठी दिनांक २४.०२.२०२६ अखेर चंद्रपूर जिल्ह्यांतर्गत एकूण १,३०७ लाभार्थ्यांचे पैसे भरणा करुन अर्ज प्राप्त झालेले असून, त्यापैकी १,२४८ लाभार्थ्यांनी पुरवठादारांची निवड केली आहे व ५०५ सौर कृषीपंप आस्थापित करण्यात आले आहे. उर्वरित पंप आस्थापित करण्याची कामे सुरु आहेत. गडचिरोली जिल्ह्यांतर्गत एकूण २,०८८ लाभार्थ्यांचे पैसे भरणा करुन अर्ज प्राप्त झालेले असून, त्यापैकी २,००८ लाभार्थ्यांनी पुरवठादारांची निवड केली आहे व ६९० सौर कृषीपंप आस्थापित करण्यात आले आहे. उर्वरित पंप आस्थापित करण्याची कामे सुरु आहेत. याव्यतिरिक्त कुसुम-घटक ब अंतर्गत चंद्रपूर जिल्ह्यात ५३५ आणि गडचिरोली जिल्ह्यात १,८८७ सौर कृषीपंप आस्थपित करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पिंपरी-चिंचवड आयुक्तालय अंतर्गत खेड (जि.पुणे) येथे विद्यमान पोलिस स्टेशन विभाजन करण्याबाबत

**(२५) ११११५१ (१३-०८-२०२५). श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.पुणे) तालुक्यातील पिंपरी-चिंचवड आयुक्तालय अंतर्गत विद्यमान पोलिस स्टेशन विभाजन करून नव्याने पोलिस स्टेशन निर्माण करणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यातील महत्वाच्या प्रशासकीय कामकामाकरीता राजगुरुनगर पोलिस स्टेशन पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तालयात समाविष्ट करणेबाबत नागरिकांची मागणी करण्यात आली असून, याबाबत प्रस्ताव तयार करण्यात आला आहे काय, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यमान व नव्याने स्थापित पोलिस स्टेशन सह विविध ठिकाणी पोलीस चौकी उभारण्याकरीता आवश्यक जागा उपलब्ध करण्यासह पोलीस स्टेशन बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०३-२०२६) :** (१) पिंपरी चिंचवड आयुक्तालय अंतर्गत खेड, जि.पुणे तालुक्यातील चाकण पोलीस ठाणे व महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाणे या पोलीस ठाण्यांचे विभाजन करणे आवश्यक असल्याने शासन निर्णय दिनांक १४.१२.२०२५ अन्वये चाकण दक्षिण पोलीस ठाणेव उत्तर महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाणे ही दोन नवीन पोलीस ठाणी निर्माण करण्यात आलेली आहेत.

(२) होय, हे ही खरे आहे. राजगुरुनगर पोलीस ठाणे कार्यक्षेत्रातील अनेक गावांचे झालेले शहरीकरण व औद्योगिकीकरण पाहता, ॲड. श्री. निलेश शंकर कड, जिल्हा कॉंग्रेस कमिटी पुणे यांनी २२.४.२०२२ रोजीच्या पत्रान्वये, श्री. नितिन गुलाबराव गोरे, सदस्य महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांनी दिनांक १२.८.२०२४ रोजीच्या पत्रान्वये तसेच नागरिकांकडून राजगुरुनगर पोलीस ठाणे पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयात समाविष्ट करण्याबाबत मागणी करण्यात आलेली होती.

तथापि, राजगुरुनगर पोलीस ठाणे पिंपरी - चिंचवड पोलीस आयुक्तालयामध्ये समाविष्ट करणेबाबतचा प्रस्ताव पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड कार्यालयाकडून सादर करण्यात आलेला नाही.
(३) चाकण पोलीस ठाणे व महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाणे या पोलीस ठाण्यांचे विभाजन करुन शासन निर्णय दिनांक १४.१२.२०२५ अन्वये नव्याने निर्माण केलेल्या चाकण दक्षिण पोलीस ठाणे व उत्तर महाळुंगे पोलीस ठाणेंसाठी मौजे चाकण, ता. खेड येथील गट नं. २४९३ मधील ४० गुंठे जागा मिळणेबाबत पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड कार्यालयामार्फत कार्यवाही चालु आहे. तसेच विद्यामान महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाणेसाठी इमारत बांधणेसाठी यापुर्वीच शासनाची मंजूरी मिळाली आहे. तसेच, नवीन पोलीस चौकीसाठी जागा उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही चालू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## खेड आळंदी (जि. पुणे) येथे चाकण एमआयडीसी, खेड सिटी सह पीएमआरडीए परिसरातील उद्योगांना वीजपुरवठा सुनिश्चित करण्याबाबत

**(२६) १११६० (०८-०९-२०२५). श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेड आळंदी (जि.पुणे) मतदारसंघातील चाकण एमआयडीसी, खेड सिटी सह पीएमआरडीए क्षेत्रातील उद्योगांना अखंडित वीजपुरवठा होत नसल्याने उद्योजकांनी याबाबत तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणची वीज-संबंधित समस्या, वाढत्या विजेची मागणी आणि खंडित स्वरुपात वीज पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी महावितरणने कोणती कार्यवाही केली आहे,
(३) असल्यास, उक्त ठिकाणच्या वाढत्या वीजेची मागणी पूर्ण करण्यासाठी सोलर विद्युत प्रकल्प मोकळया जागा व छत येथे कार्यान्वित करण्यासाठी शासन निर्णय घेणार आहे काय, तसेच संबंधित उद्योगांना प्रोत्साहन देण्यात येणार आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तदनुसार उक्त ठिकाणच्या उद्योजकांना अखंडित स्वरुपात वीज पुरवठा करण्याकरीता कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२६) :** (१) हे अंशतः खरे आहे.
चाकण एमआयडीसी, खेड सिटी सह पीएमआरडीए क्षेत्रातील उद्योगांना अखंडित वीजपुरवठा होत नसल्याच्या तक्रारी काही उद्योजकांनी केल्या आहेत.
(२) सदर ठिकाणी विजेची वाढती मागणी तसेच सुरळीत अखंडित वीजपुरवठ्यासाठी महापारेषणतर्फे ४०० केव्ही चाकण, २२० केव्ही ब्रिजस्टोन व २२० केव्ही चाकण या अतिउच्चदाब उपकेंद्रांमध्ये रोहित्राची क्षमतावाढ प्रस्तावित करण्यात आली आहे. ४०० केव्ही चाकण अतिउच्चदाब उपकेंद्रात ५० MVA क्षमतेचे अतिरिक्त रोहित्र दिनांक १७.१०.२०२५ रोजी कार्यान्वित करण्यात आले.
(३) शासनाच्या विविध योजनाद्वारे सौर प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी महावितरणतर्फे ग्राहकांना मार्गदर्शन व प्रोत्साहन देण्यात येते. खेड तालुक्यात एकूण २००९ ग्राहकांच्या छतावर सौरप्रणाली बसविण्यात आली असून, त्याची एकूण अपारंपरिक ऊर्जाक्षमता ११४.४९ मेगावॅट इतकी आहे.
(४) वीज यंत्रणाचे सक्षमीकरण करण्याकरीता महावितरणच्या विविध योजनांद्वारे (SIDBI, MIDC सक्षमीकरण

योजना, नागपूर पुणे विशेष सहाय्य योजना इत्यादी) सुमारे ७५.५४ कोटी रक्कमेचे कामे सुरु आहेत. यापैकी एमआयडीसी फेज १ अंतर्गत २२ केव्ही हुंडाई, २२ केव्ही किंगफा व २२ केव्ही म्हाळुंगे ही स्विचींग उपकेंद्रे कार्यान्वित करण्यात आली आहेत. यामुळे चाकण MIDC परिसरातील वीजपुरवठा हा अधिक दर्जेदार व अखंडित करण्यात आला आहे. तसेच SIDBI व नागपूर, पुणे विशेष सहाय्य योजनेअंतर्गत कामे प्रगतीपथावर आहेत. महावितरण कंपनीने औद्योगिक ग्राहकांसाठी “स्वागत” कक्षाची स्थापना केली आहे. त्यानुसार प्रत्येक महिन्याच्या पहिल्या आठवडयात उद्योजक संघटनेसोबत आढावा बैठक घेतली जाते व बैठकीमध्ये उपस्थित केलेल्या तक्रारी व अडचणींवर त्वरीत कार्यवाही करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## स्वारगेट (जि.पुणे) येथील एस.टी. बस स्थानकावर ‘मोफत स्वच्छतागृह’ या नावाखाली महिला प्रवाशांकडून शुल्क आकारत असल्याबाबबत

**(२७) ११५०१ (०६-१०-२०२५). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्वारगेट (जि.पुणे) येथील एस.टी. बस स्थानकावर ‘मोफत स्वच्छतागृह’ या नावाखाली प्रत्यक्षात महिला प्रवाशांकडून पाच रुपये शुल्क आकारले जात असून हे शुल्क पुरुष कर्मचाऱ्यांकडून घेतले जात असल्याचे स्पष्ट झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या स्वच्छतागृहावर ‘मोफत’ असा स्पष्ट फलक लावलेला असूनही प्रत्यक्षात पैसे घेण्यात येत असल्यामुळे प्रवाशांची फसवणूक होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक परिसरातील स्वच्छतागृह व्यवस्थापनाचा करार कोणत्या कंपनीकडे दिला आहे व त्या करारामध्ये ‘मोफत सेवा’असे नमूद केले आहे काय,

(४) असल्यास, स्वच्छतागृहात पुरुष कर्मचारी नियुक्त असल्यामुळे महिला प्रवाशांची गैरसोय होत असून महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रवाशांकडून बेकायदेशीर शुल्क वसूल करणाऱ्या कर्मचाऱ्यांविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (०८-०४-२०२६) :** (१) व (२) महिला व १२ वर्षाखालील मुलांसाठी मुतारीची व्यवस्था नि:शुल्क असुन शौचालय व स्नानगृह सुविधा मात्र सशुल्क आहे.

(३) स्वारगेट बसस्थानकातील मुख्य बसस्थानक स्वच्छतागृह परिचालनाकरीता सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हिस ऑर्ग. ४०१/४०२, ईस्टर्न कोर्ट, व्ही. एन. पुर्व मार्ग, चेंबुर, मुंबई या संस्थेसोबत करार करण्यात आलेला आहे. करारामधील अटी व शर्तीनुसार विशेष सेवेसाठी म्हणजे शौचालय वापरासाठी रु.०५.००/- व स्नानगृह वापरासाठी रु.०७.००/- एवढे शुल्क आकारणीची तरतुद आहे. तसेच महिला व पुरुषांकरीता मुतारीची सोय मोफत आहे. १२ वर्षाखालील मुलां मुलींसाठी व दिव्यांगासाठी शौचालय व मुतारीचा वापर मोफत आहे.

(४) महिला स्वच्छतागृहाकरीता स्वतंत्र महिला कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे करारानुसार बंधनकारक आहे.

(५) व (६) प्रवाशांकडुन वेळोवेळी बेकायदेशीररित्या शुल्क आकारल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर बसस्थानक प्रमुख यांचेकडुन तपासणी करून संबंधित संस्थेस आगार पातळीवर आगार व्यवस्थापक यांच्यामार्फत दंड करण्यात येतो.

---

**पाली (जि.बीड) येथील मंजुर असलेल्या ३३/११ के.व्ही सबस्टेशनचे काम सुरु करण्याबाबत**

**(२८) ११५६८ (१९-०९-२०२५). श्री.संदिप क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाली (जि.बीड) येथे ३३/११ के.व्ही. सबस्टेशन मंजुर स्थितीत असून, सदरील सबस्टेशनचे काम तात्काळ सुरू होणे बाबत त्या परिसरातील ७ ते ८ गावातील शेतकरी व ग्रामस्थांचा वारंवार पाठपुरावा सुरू आहे तसेच तत्संदर्भात मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी संबंधित विभागाकडे या बाबतीत पत्रव्यवहार देखील केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी आजतागायत कार्यवाही करण्यात आली नसल्याने, उक्त मंजूर असलेल्या पाली सबस्टेशनचे अंदाजपत्रकाचे काम दुबार करुन तात्काळ काम सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक०३.०२.२०२३ नुसार पाली येथे ३३/११ केव्ही उपकेंद्र उभारण्याची मागणी केली आहे.
(२) मौजे पाली, ता.बीड येथे नवीन ३३/११ के.व्ही. १X५ एम.व्ही. ए. क्षमतेचे उपकेंद्र हे "एशियन डेवलपमेंट बँक (ADB) अर्थसहाय्यीत प्रणाली सक्षमीकरण" योजनेअंतर्गत समाविष्ट आहे. सदर उपकेंद्राकरीता लागणारी जागा महावितरण कंपनीच्या ताब्यात घेण्यात आलेली असून, संबंधित कामांच्या निविदा प्रकिया प्रगतीपथावर आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूरसह राज्यात महावितरणने वीज देयकासोबत अतिरिक्त सुरक्षा ठेवीची देयके पाठवल्याने असंतोष निर्माण झाल्याबाबत**

**(२९) ११७७५ (०८-०९-२०२५). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूरसह राज्यात महावितरणने माहीत माहे एप्रिल, २०२५ च्या नियमित वीज देयकासोबत अतिरिक्त सुरक्षा ठेवीची देयके पाठवल्याने ग्राहकांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे शासनाने निर्णय घेऊन अतिरिक्त सुरक्षा ठेवीची देयके मागे घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही.

माहे एप्रिल, २०२५ च्या नियमित वीज देयकासोबत अतिरिक्त सुरक्षा ठेवीची देयके पाठवली होती.
(२) मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता, वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके आणि पॉवर क्वालिटी) विनियम, २०२१ कलम १३.६ मधील तरतूदीनुसार वितरण परवाना धारकाला ग्राहकाकडे अतिरिक्त सुरक्षा ठेवीच्या रकमेची मागणी करता येते. त्यानुसार ग्राहकास अतिरिक्त सुरक्षा ठेवीची देयके देण्यात आली होती.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**येवता व येळंबधाट (ता.केज, जि.बीड)) येथील ३३ के.व्ही. उपकेंद्रातील ५ एम.व्ही. ट्रान्सफार्मर निकामी झाल्याबाबत**

**(३०) ११८३८ (०८-०९-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केज (जि.बीड) तालुक्यातील येवता व येळंबधाट येथील ३३ के.व्ही. उपकेंद्रातील ५ एम.व्ही. ट्रान्सफार्मर निकामी झाल्यामुळे सदर उपकेंद्राअंतर्गत विद्युत पुरवठा बंद असल्याने सदर ट्रान्सफारमर उपलब्ध करून देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री यांचेकडे दिनांक २७ मे, २०२५ व दिनांक ३० मे, २०२५ रोजी निवेदनाद्वारे केली आहे. हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) केज (जि. बीड) तालुक्यातील ३३/११ के. व्ही. येवता उपकेंद्रातील ५ एम. व्ही.ए. उच्चदाब रोहित्र दिनांक २९.०५.२०२५ रोजी नादुरुस्त झाले होते. सदर ठिकाणी दुसरे ५ एम. व्ही.ए. उच्चदाब रोहित्र उपलब्ध करुन दिनांक १०.०६.२०२५ रोजी कार्यान्वित करण्यात आले आहे.

तसेच केज (जि. बीड) तालुक्यातील ३३/११ के. व्ही. येळंबधाट उपकेंद्रातील ५ एम.व्ही.ए. उच्चदाब रोहित्र दिनांक २१.०५.२०२५ रोजी नादुरुस्त झाले होते. सदर ठिकाणी दुसरे ५ एम.व्ही.ए. उच्चदाब रोहित्र उपलब्ध करुन दिनांक २३.०६.२०२५ रोजी कार्यान्वित करण्यात आले आहे. रोहित्र नादुरुस्त कालावधीत या नादुरुस्त रोहित्रांद्वारे विद्युतपुरवठा होणाऱ्या ग्राहकांना अन्य स्रोतांद्वारे विद्युतपुरवठा करण्यात आला होता.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भिंवडी (जि.ठाणे) शहरातील कायमस्वरुपी खंडीत (पीडी) ग्राहकांसाठी सुरु केलेली “ Special Amnesty Scheme-२०२३” योजनेला पूर्ववत सुरु करुन एक वर्षाची मुदतवाढ देण्याबाबत**

**(३१) ११८५१ (१९-०९-२०२५). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिंवडी (जि.ठाणे) शहरातील कायमस्वरुपी खंडीत (पीडी) ग्राहकांसाठी सुरु केलेली “Special Amnesty Scheme-२०२३" योजनेला पूर्ववत सुरु करुन एक वर्षाची मुदतवाढ देणेबाबत लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांना दिनांक २७ मे, २०२५ रोजी पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) महावितरणकडून भिवंडी वितरण फ्रॅन्चाईझी विभागातील कायमस्वरुपी वीज पुरवठा खंडित असलेल्या ग्राहकांसाठी “वितरण फ्रॅन्चाईझी विशेष सवलत योजना- २०२३” (DF Special Amnesty Scheme- २०२३ for PD Consumers) माहे नोव्हेंबर, २०२३ ते माहे नोव्हेंबर, २०२४ पर्यंत राबविण्यात आली. तद्नंतर

“महावितरण अभय योजना २०२४” अंतर्गत सदर योजनेस दिनांक ३१ मार्च, २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

माहे १ ऑक्टोबर, २०२३ रोजी भिवंडी वितरण फ्रॅन्चाईझी विभागात एकूण १५७५३५ कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडित असलेले वीज ग्राहक होते व त्यांची एकूण थकबाकी रु.१२१३.२० कोटी इतकी होती. त्यापैकी ४०७७४ इतके यंत्रमागधारक वीजग्राहक होते व त्यांची एकूण थकबाकी रु.६००.११ कोटी इतकी होती. माहे मार्च, २०२५ पर्यंत “भिवंडी वितरण फ्रॅन्चाईझी विशेष सवलत योजना-२०२३” अंतर्गत एकूण १०१२ वीज ग्राहकांनी फक्त रु.५.८८ कोटी (०.५०%) (त्यामध्ये ३७७ यंत्रमागधारक वीजग्राहकांचा रु.३.६६ कोटीचा (०.६१%) भरणा अंतर्भूत) इतक्या अत्यल्प रकमेचा भरणा केला.

भिवंडी शहरातील कायमस्वरुपी खंडित (पीडी) ग्राहकांसाठी सुरु केलेली “Special Amnesty Scheme-२०२३ योजनेला ५ महिने मुदतवाढ देऊन सुद्धा या योजनेस अतिशय कमी प्रतिसाद प्राप्त झाल्यामुळे पुनश्चः मुदतवाढ देण्याची बाब निर्णयप्रक्रियेत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सावनेर (जि.नागपूर) येथील जुने ट्रान्सफॉर्मर बदलण्याबाबत

**(३२) ११८९६ (१९-०९-२०२५). डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावनेर (जि.नागपूर) येथील क्रिडा संकुल गेटसमोर तसेच सुभाष शाळेजवळ शॉकसर्कीट होऊन विजेच्या ट्रान्सफॉर्मरासह झुणका भाकर केंद्र जळून खाक झाल्याचे दिनांक २७ एप्रिल, २०२५ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आगीमध्ये कोणती जिवीत व वित्तहानी झाली आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दुर्घटनेतील व्यक्तींना आर्थिक मदत करण्यासह सावनेर शहरातील विजेचे जुने ट्रान्सफॉर्मर बदलण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही,

प्राथमिक तपासणीच्या निष्कर्षानंतर सदर आग ही वीजेच्या शॉर्ट सर्किटमुळे लागली नसल्याचे निष्पन्न झाले आहे.

(२) व (३) सदर घटनास्थळी पोलीस अधिकारी व कर्मचारी, अग्निशामन दलाचे अधिकारी व कर्मचारी व महावितरणच्या कर्मचाऱ्यांसमक्ष पोलीस पंचनामा करण्यात आला. प्राथमिक तपास समोर दिसणारे परिस्थितीजन्य पुरावे व झुणका भाकर केंद्र चालकाच्या बयानानुसार सदर आग ही विजेच्या शॉर्ट सर्किटमुळे लागली नसल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे. सदर आगीमध्ये कुठलीही जीवितहानी झालेली नसून नाही.

सावनेर शहरातील वीज वितरण यंत्रणेच्या जाळयाचे नुतनीकरण, सक्षमीकरण करण्याकरीता शासनाच्या निरंतर वीज योजनेंतर्गत सावनेर शहरातील ८ ठिकाणचे जुने रोहीत्र बदलवून त्या ठिकाणी नवीन रोहीत्र बसविण्यात आले आहेत.

केंद्र शासनाच्या सुधारित वितरण क्षेत्र योजना (RDSS) अंतर्गत ३ अतिरिक्त रोहीत्र शहराचा वीज पुरवठा सुरळीत व अखंडीत ठेवण्याकरीता, अतिभारीत रोहीत्रांचा भार कमी करण्याकरीता बसविण्यात आले आहे. तसेच सावनेर शहराच्या वीज वितरण करणाऱ्या व धोकादायक असलेल्या एकूण ६ कि.मी. लांबीच्या उपरी लघुदाब तारमार्ग वाहिनीचे एबी केबलद्वारे परिवर्तन करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अंबरनाथ (जि.ठाणे) ट्रक टेम्पो वाहतूक संघटनेच्या कर्मचाऱ्यांना करण्यात येत असलेली मारहाण

**(३३) १२००६ (१९-०९-२०२५). श्री.जयंत पाटील (ईश्वरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ शंभर ट्रक टेम्पो चालक-मालक वाहतूक संघटना ही नोंदणीकृत संघटना गेल्या तीस वर्षापासुन कार्यरत असून, अंबरनाथ महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडळाकरीता टेम्पो सर्विस पुरविण्याचे काम करीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परिसरातील श्री.पंडीत कृष्णा खरे हे देखील टेम्पो मालक असून येथे खाजगीरित्या टेम्पो पुरविण्याचे काम करीत असून, उक्त संघटनेतील टेम्पो मालकांना शिवीगाळ व मारहाण करुन त्यांना परिसरात व्यवसाय करण्यापासून मज्जाव करीत आहेत तसेच महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडळातील उद्योजकांना देखील धमकावून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी श्री.खरे यांच्याविरुद्ध अंबरनाथ ट्रक टेम्पो चालक-मालक वाहतूक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी शिवाजी नगर पोलीस ठाणे, अंबरनाथ येथे तक्रार दाखल केली असता त्यांच्याविरुद्ध कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास सदर प्रकरणी दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने संबंधित व्यक्तीविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

अंबरनाथ ट्रक टेम्पो माल वाहतुक संघटना हि नोंदणीकृत संघटना असुन त्यांचा रजिस्टर नंबर काउआ/ठाणे/१९६८/ २०२२, दिनांक ०६/०१/२०२२ असा आहे. तसेच सदरचे संघटनेमार्फत महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळाकरीता टेम्पो सर्विस पुरविण्यात येत आहे.

(२) व (३) अंबरनाथ ट्रक टेम्पो माल वाहतुक संघटनेतील श्री. संदिप रामा सावंत यांनी दिनांक २३/०५/२०२५ रोजी पंडीत खरे यांनी त्यांना शिवीगाळ व धमकी/मारहाण केलेबाबत तक्रार केल्याने शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथे अदखलपात्र गुन्हा नोंद क्र. १०४६/२०२५ दिनांक २३/०५/२०२५ रोजी भारतीय न्याय संहिता कलम १३१,११५(२), ३५२, ३५१(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

परंतु पंडीत खरे यांचेकडुन महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळातील उद्योजकांना देखील धमकावुन दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असलेबाबतची तक्रार शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथे प्राप्त नाही.

(४) सदर प्रकरणी पंडीत खरे यांना भारतीय न्याय सुरक्षा संहिता कलम १६८ प्रमाणे नोटीस देवुन समज देण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर शहरात सेफ सिटी प्रकल्पांतर्गत सीसीटीव्ही कॅमेऱ्याची उभारणी करण्याबाबत

**(३४) १२००९ (०७-०८-२०२५). श्री.अमल महाडिक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरात सेफ सिटी प्रकल्पांतर्गत सीसीटीव्ही कॅमेऱ्याची उभारणी करण्यात आली होती परंतु, सद्य:स्थितीत देखभाल व दुरुस्ती अभावी यातील बहुतांश कॅमेरे बंद अवस्थेत असल्यामुळे गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना अडचणी येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर शहराबरोबरच संलग्न ग्रामीण भागामध्ये सेफ सिटी योजनेअंतर्गत नवीन सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे आणि कंट्रोल रूम उभारण्याबाबत प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०३-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे.

कोल्हापूर महानगरपालिका मार्फत कोल्हापूर शहर सुरक्षित प्रकल्पाची अंमलबजावणी करणेसाठी पहिल्या टप्प्यामध्ये महत्वाच्या ६५ ठिकाणी १६५ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. सदरचा प्रकल्प कोल्हापूर महानगरपालिकाकडून पोलीस अधिक्षक कोल्हापूर कार्यालयाकडे देखभाल व दुरुस्तीसाठी वर्ग करण्यात आला आहे. पोलीस अधिक्षक,कोल्हापूर कार्यालयाकडून सदर सीसीटीव्ही प्रकल्पाचा देखभाल व दुरुस्तीसाठी पहिला करार समाप्त झालेनंतर नव्याने चालू वर्षी दिनांक ५.३.२०२५ ते ४.३.२०२६ या एक वर्ष कालावधीसाठी सेवासंविदा करार दिनांक ५.३.२०२५ अन्वये करण्यात आला आहे. सेवासंविदा करार झालेनंतर १६५ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांपैकी माहे मे, २०२५ च्या पहिल्या सप्ताहामध्ये १०२ सीसीटीव्ही कॅमेरे सुरु करण्यात येऊन कार्यान्वित करण्यात आले आहेत. माहे मे, २०२५ च्या तिसऱ्या आठवड्यापर्यंत १५३ सीसीटीव्ही कॅमेरे सुरु करुन कार्यान्वित करण्यात आले आहेत. तसेच माहे ऑक्टोंबर पर्यंत शेवटच्या आठवड्यामध्ये १६० सीसीटीव्ही कॅमरे सुरु करण्यात येऊन कार्यान्वित करण्यात आले आहेत. उर्वरीत ५ कॅमेरे सुरु करण्याचे काम अंतिम टप्प्यात असून सद्यस्थितीमध्ये कोल्हापूर शहरामधील वरील प्रमाणे सीसीटीव्ही यंत्रणा सुरु असून ती सुरळीतपणे कार्यान्वित आहे.

(२) गृह विभाग, शासन पत्र, दिनांक २८.१०.२०२४ व दिनांक २८.५.२०२५ अन्वये कळविण्यात आल्यानंतर कोल्हापूर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरण अंतर्गत येणाऱ्या ३९ गावांमधील सर्व्हेक्षण करुन सीसीटीव्ही कॅमेरे बसविणेबाबत सीसीटीव्ही प्रकल्प प्रस्ताव तयार करण्यासाठी संनिरीक्षण प्रकल्प समिती गठीत करण्यात आली असून Model detail Project report तयार करण्याचे काम सुरु असून सदर प्रस्ताव पोलीस महासंचालक कार्यालयामार्फत शासनास पाठविण्याची कार्यवाही सुरु असल्याचे पोलीस अधिक्षक कार्यालयाने कळविले आहे.

तसेच सन्माननीय वि.स.स. श्री. अमल महाडीक, यांनी या कार्यालयास दिले पत्राप्रमाणे दक्षिण विधानसभा मतदार संघातील पोलीस ठाणे अंतर्गत त्यांचे हद्दीमध्ये सीसीटीव्ही आवश्यक ठिकाणीचा आढावा घेण्याचे काम चालू असून योग्य तो प्रस्ताव सादर करण्याची दक्षता घेण्यात आली आहे.

वरीलप्रमाणे अ.क्र.१ व २ मधील तपशिलवार माहितीनुसार कोल्हापूर शहरामध्ये व ग्रामीण भागातील आवश्यक ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी संबंधित कार्यक्षेत्रातील पोलीस स्टेशनच्या मार्फतीने आढावा घेण्यात येत असून माहिती प्राप्त होताच शासन निर्णय गृह विभाग क्र.सीसीटी -३६२३/प्र.क्र.१२१/पोल-३, दिनांक२५.१.२०२४ मधील मार्गदर्शक तत्वानुसार सीसीटीव्ही प्रकल्प अहवाल (DPR) हा स्थानिक सीसीटीव्ही संनिरीक्षण प्रकल्प समितीच्या मार्फत करण्याची कारवाई सध्या चालू आहे.

तसेच सन्माननीय वि.स.स. श्री. अमल महाडीक, यांचे दिनांक २३.६.२०२५ पत्राप्रमाणे तसेच सदर पत्रावर शासन गृह विभागाकडिल १.८.२०२५ रोजीच्या पत्राप्रमाणे व मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडिल दिनांक २५.९.२०२५ रोजीच्या पत्रामधील सुचनेप्रमाणे कोल्हापूर शहराचा नव्याने सीसीटीव्ही प्रकल्प प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही सुध्दा सुरु असून सदरची कारवाई पूर्ण होताच प्रस्ताव मंजूरीसाठी शासनास तात्काळ पाठविण्याची दक्षता घेत आहे, असे पोलीस अधिक्षक, कोल्हापूर कार्यालयाकडून कळविण्यात आले आहे. त्यानुसार कोल्हापूर शहर सीसीटीव्ही प्रकल्प अहवाल (DPR) शासनास प्राप्त झाल्यावर पुढील अनुषंगिक कार्यवाही गृह विभागाकडून करण्यात येईल.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## लातूर येथे राज्य राखीव पोलीस दल मंजूर करणे बाबत

**(३५) १२०३६ (०८-०९-२०२५). श्री.अभिमन्यु पवार (औसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर, धाराशिव, नांदेड, बीड जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्थेबाबत निर्माण झालेली स्थिती तत्परतेने नियंत्रणात आणण्यासाठी लातूर येथे राज्य राखीव पोलीस दल गट मंजूर करून कार्यान्वित करण्याबाबत औसा विधानसभा स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे माहे मार्च, २०२५ मध्ये निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर दिनांक २२.०३.२०२५ रोजी मा. मुख्यमंत्री महोदयांना सादर केलेल्या निवेदनातील नमूद मुद्यांच्या अनुषंगाने पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयाकडून दिनांक २९.०४.२०२५ रोजीच्या शासन पत्राद्वारे वस्तुस्थिती/सुस्पष्ट अभिप्राय मागविण्यात आले होते.

त्यासअनुसरुन पोलीस महासंचालक कार्यालयाकडून दिनांक १२.०८.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे लातूर येथे राज्य राखीव पोलीस बल दल गट मंजूर करण्याच्या अनुषंगाने वस्तुस्थितीनिष्ठ अहवाल सादर करण्यात आला आहे. या अहवालावर कार्यवाहीच्या अनुषंगाने राज्यातील सद्यःस्थितीतील राज्य राखीव पोलीस बल गटाबाबतची अधिकची माहिती दिनांक ११.०२.२०२६ रोजीच्या पत्रान्वये मागविण्यात आली असून, त्यानुसार सदर मागणीच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याची तजवीज ठेवली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## निंबवडे, आटपाडी, खानापूर व जत (जि.सांगली) या तालुक्यामध्ये वीज उपकेंद्र नसल्याने परिसरात विजेची समस्या निर्माण झाल्याबाबत

**(३६) १२१०८ (१९-०९-२०२५). श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.गोपिचंद पडळकर (जत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आटपाडी, खानापूर व जत (जि.सांगली) या तालुक्यामध्ये निंबवडे, टेंभू, ताकारी, म्हसाळ उपसा सिंचन योजनामुळे गेल्या ९ ते १० वर्षामध्ये शेतीपंपाच्या वीज जोडण्या देण्यात आल्या, परंतु त्या प्रमाणात नवीन अतिरिक्त वितरण रोहित्र व नवीन ३३/११ KV उपकेंद्र न झाल्यामुळे रोहीत्रामध्ये वारंवार बिघाड होणे तसेच कमी

विद्युतभार याचा शेतकऱ्यांना सामना करावा लागत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यासाठी अतिरिक्त वितरण रोहित्रे व नवीन ३३/११ KV उपकेंद्र उभे करणे आवश्यक असून त्याकरीता खानापूर व आटपाडी तालुक्यातील ६ उपकेंद्रासाठी रुपये ९० कोटी व जत तालुक्यातील १२ उपकेंद्रासाठी रुपये १४५ कोटी निधीची आवश्यकता असून सदरहू निधी उपलब्ध करुन देण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाने मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आटपाडी, खानापूर व जत तालुक्यात अतिरिक्त वितरण रोहित्र व नवीन उपकेंद्र उभारण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

सन २०२०-२१ ते सन २०२४-२५ या कालावधीमध्ये सांगली जिल्ह्यात खानापूर व आटपाडी तालुक्यात ५ एमव्हीए क्षमतेची ४ नवीन उपकेंद्रे व जत तालुक्यामध्ये ५ एमव्हीए क्षमतेचे ३ नविन उपकेंद्रे कार्यान्वित करण्यात आली आहेत. सांगली जिल्ह्यात खानापूर व आटपाडी तालुक्यात उपकेंद्राची क्षमतावाढ या योजनेमध्ये ६ अतिरिक्त पॉवर ट्रान्सफॉर्मर व जत तालुक्यामध्ये ८ अतिरिक्त पॉवर ट्रान्सफॉर्मर कार्यान्वित करण्यात आले आहेत.

जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण अंतर्गत सन २०२२ पासून खानापूर, आटपाडी तालुक्यात एकूण ३०३ नवीन वितरण रोहित्रे व जत तालुक्यात एकूण ९१ नवीन वितरण रोहित्र कार्यान्वित करण्यात आली आहेत. रोहित्र नादुरूस्त होण्याचा दर सन २०२३-२४ या साली ६.९ इतका होता व सन २०२४-२५ या साली ४.९ इतका असून रोहित्र नादुरूस्त होण्याचे प्रमाण कमी झाले आहे. सद्य:स्थितीत या तालुक्यांमध्ये कोणतेही नादुरुस्त वितरण रोहित्र बदलणे बाकी नाही. सदर पायाभूत आराखडयाची कामे झाल्यामुळे सद्यस्थितीत शेती पंप वीज पुरवठा योग्य दाबाने व सुरळीत चालू आहे.

(२) हे खरे आहे.

(३) आटपाडी व खानापूर तालुक्यात नवीन उपकेंद्रांची ७ कामे प्रगतीपथावर आहेत व ४ काम पूर्ण झाली आहेत. तसेच जत तालुक्यात नवीन उपकेंद्रांचे १ काम हे प्रगतीपथावर असून, ३ कामे ही पूर्ण झाली आहेत व ३ कामे प्रस्तावित आहेत. उपकेंद्र क्षमतावाढ या योजनेमध्ये आटपाडी व खानापूर तालुक्यात १ काम प्रगतीपथावर असून ६ कामे ही पूर्ण झालेली आहेत, तसेच ३ कामे ही प्रस्तावित आहेत. त्याचप्रमाणे या योजनेमध्ये जत तालुक्यात ८ कामे ही पूर्ण झाली आहेत. व ६ कामे ही प्रगतीपथावर असून, ३ कामे प्रस्तावित आहेत. सदर निधी मागणी अनुषंगाने आटपाडी व खानापूर तालुक्यात नविन उपकेंद्र व उपकेंद्रांची क्षमतावाढची रु.२०.५१ कोटी निधीची नवीन उपकेंद्रांची कामे पूर्ण झाली आहेत तर रु.३६.४५ कोटी निधीची कामे प्रगतीपथावर आहेत. जत तालुक्यात नविन उपकेंद्र व उपकेंद्रांची क्षमतावाढीची रु.१०.६२ कोटी निधीची कामे पूर्ण झाली आहेत व रु.११.९० कोटी निधीची कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच, रु.१४.८० कोटी निधीची कामे प्रस्तावित आहेत. जिल्हा नियोजन समितीकडून नविन वितरण रोहित्रासाठी आटपाडी व खानापूर तालुक्यासाठी रु.१८ कोटी व जत तालुक्यासाठी रु. ७ कोटी निधीची कामे प्रस्तावित असून, त्यातील काही कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गडचिरोली जिल्ह्यातील जिर्ण झालेले लोखंडी विद्युत खांब बदलण्याबाबत

**(३७) १२३५१ (१९-०९-२०२५). श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यात अनेक वर्षापुर्वी लावण्यात आलेले गावांबाहेरील लोखंडी विद्युत खांब जमीनीच्या बाजूने गंजून जिर्ण झाल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी वादळी वाऱ्यामुळे खांब कोसळल्यास मोठी दुर्घटना होण्याची शक्यता निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२६) :** (१) हे खरे आहे,

महावितरण कंपनीमार्फत सर्वेक्षण केले असता गडचिरोली जिल्ह्यामध्ये विद्युत वाहिनीचे २९१ लोखंडी विद्युत खांब गंजलेले आढळून आले आहेत.

(२) हे खरे नाही.

धोकादायक स्थितीत असलेले १०५ लोखंडी विद्युत खांब सन २०२४-२५ मध्ये तर १८६ लोखंडी विद्युत खांब सन २०२५-२६ मध्ये असे एकूण २९१ धोकादायक विद्युत खांब बदलण्यात आलेले आहेत.

(३) विद्युत खांब गजलेले आढळल्यास देखभाल व दुरुस्ती करणाऱ्या कंत्राटदारामार्फत त्वरीत बदलण्यात येतात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापुर जिल्ह्यात मेहसाणा मुऱ्हा अशा जातीवंत म्हशी आणि देशी गोवंशाचे संशोधन केंद्र उभारण्याबाबत

**(३८) १२३९६ (०७-०८-२०२५). श्री.अमल महाडिक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यात दुग्ध व्यवसाय मोठ्या प्रमाणात केला असून यासाठी जातिवंत जनावरांची पैदास आणि खरेदी विक्री मोठ्या प्रमाणात होते तथापि स्थानिक पशुपालकांना कृत्रिम रेतनाची सुविधा उपलब्ध नसल्यामुळे अन्य राज्यांवर अथवा जिल्ह्यांवर अवलंबून राहावे लागत असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यासाठी कोल्हापुरात मेहसाणा मुऱ्हा अशा जातीवंत म्हशी आणि देशी गोवंशाचे संशोधन केंद्र उभारल्यास दुग्ध उत्पादकांना जातिवंत जनावरे उपलब्ध होतील, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, स्पर्म बँक आणि जीन बँक स्थापन करून जनावरांचे संगोपन करण्याकरिता शासनाचे धोरण व उपाययोजना केली आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०२-१२-२०२५) :** (१) हे खरे नाही.

(२) राज्याच्या पशुपैदास धोरणानुसार राज्यातील स्थानिक जातीच्या पशुधनाचे संशोधन केले जाते. मेहसाणा व मुऱ्हा या जातींचे मुळ स्थान महाराष्ट्राच्या बाहेर आहे.

(३) राज्यातील पशुपालकांना जातीवंत म्हशी आणि देशी गोवंशाच्या वीर्यापासून निर्मित गोठित रेतमात्रांचा पुरेशा प्रमाणात पुरवठा ३ शासकीय गोठमात्रा निर्मिती केंद्रातून केला जातो.
(४) प्रश्न उद्‌भवत  नाही.

---

## महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनीला अवादा एनर्जी कंपनीमडून ४०० मेगावॉल्ट विज २.६९ रूपये प्रति युनिट दराने सौरऊर्जा खरेदी केल्याबाबत

**(३९) १२५६६ (१४-०८-२०२५). श्री.जयंत पाटील (ईश्वरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनीला अवादा एनर्जी कंपनीकडून ४०० मेगावॅाट विज २.६९ रूपये प्रति युनिट दराने सौरऊर्जा खरेदी करण्यास महाराष्ट्र विज नियामक आयोगाने माहे मे, २०२५ मध्ये मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गतवर्षी महावितरण कंपनीने २.७० रुपये प्रति युनिट दराने सौर ऊर्जा खरेदी केली असता आता जादा दराने सौरऊर्जा खरेदी करण्यामागची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०२-२०२६) :** (१)  हे अंशत : खरे आहे,

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने ४०० मेगावॅट सौर ऊर्जा मे. अवादा एनर्जी यांचेकडून रु.२.७९ प्रती युनिट या दराने खरेदी करण्यास दिनांक १५.०५.२०२५ रोजीच्या आदेशाव्दारे मंजूरी दिली आहे. प्रस्तुत वीज खरेदी आदेश माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या निविदेशी संबंधित आहे.
(२) माहे मार्च, २०२४ मध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या निविदेच्या अनुषंगाने मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने रु २.७० प्रतियुनिट दराने सौर ऊर्जा खरेदी करण्यास मंजूरी दिलेली आहे. सदर (२०२४) निविदा प्रक्रिये दरम्यान प्राप्त झालेला वीज दर (२.७०) हा २०२३ मधील दरापेक्षा (२.७९) कमी आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## उंबरे (जि.नागपूर) तालुक्यातील कुही फाट्याजवळ असलेल्या खदानीमध्ये पाच व्यक्तींचा झालेला मृत्यू

**(४०) १२५६७ (१९-०९-२०२५). श्री.जयंत पाटील (ईश्वरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उंबरे (जि.नागपूर) तालुक्यातील कुही फाट्याजवळ असलेल्या खदानीमध्ये रंजना सुर्यकांत राऊत, रोशणी चंद्रकांत चौधरी, मोहित चंद्रकांत चौधरी, लक्ष्मी चंद्रकांत चौधरी व अहतेशाम मुक्तार अंसारी अशा पाच व्यक्तींचा दिनांक १२ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास मृत्यू झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळुन आले व त्यानुषंगाने मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांना आर्थिक मदत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०३-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणाची चौकशी केली असता असे दिसून आले की, एकुण ५ व्यक्ती आंघोळीकरिता खदानीमध्ये गेले असता खदानीतील पाण्याचा अंदाज न आल्याने त्यांचा बुडुन मृत्यु झाला आहे. यामध्ये कोणताही घातपात वगैरे प्रकार दिसुन आलेला नाही. तसेच, मृतकांचे शवविच्छेदनात व्हिसेरा अहवाल न्यायवैद्यकिय प्रयोगशाळा नागपुर येथे तपासणीकरिता पाठविण्यात आला असता त्यामध्ये सामान्य आणि रासायनिक चाचणीमध्ये कोणतेही विष आढळून आले नसल्याचे नमूद आहे. शवविच्छेदन अहवालात पाचही जणांचा मृत्यू पाण्यात बुडून झाल्याचे म्हटले आहे.

मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांना आर्थिक मदत मिळणेबाबतचा कोणताही प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे येथील विभागीय आयुक्त कार्यालयातील अधिकाऱ्यांनी १०० बिंदू नियमावलीमध्ये अनियमितता केल्याबाबत

**(४१) १२६५३ (०९-१०-२०२५). श्री.गोपिचंद पडळकर (जत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील विभागीय आयुक्त कार्यालयातील मागासवर्ग कक्षाचे अधिकारी, सहाय्यक आयुक्त व इतर जबाबदार कर्मचाऱ्यांनी शासकीय/ निमशासकीय कार्यालये, जिल्हा परिषदा, महानगरपालिका व शिक्षण संस्थेच्या १०० बिंदू नियमावलीमध्ये अनियमितता केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, श्री.संदीप निवृत्ती फणसे, केंद्रीय सदस्य, रिपब्लिकन एम्पलाईज फेडरेशन तथा संस्थापक अध्यक्ष राष्ट्रीय रोस्टर हक्क अधिकार न्याय संघटना भारत यांनी याबाबतची तक्रार दिनांक १७ मार्च, २०२५ रोजी वा त्यासुमारास वरिष्ठ पोलिस निरीक्षक यांचेकडे केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अधिकाऱ्यांनी अनियमितता करून १०० बिंदू नियमावली नोंद वह्यांची अंतिम तपासणी केली असून त्यामध्ये अनुसूचित जातींची हजारो रिक्त पदे इतर जात प्रवर्गास दिली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त अनियमिततेमुळे अनुसूचित जातींच्या हजारो बेरोजगाराचे नुकसान झाले असून सदरहू अधिकाऱ्यांवर फौजदारी अ‍ॅट्रॉसिटी अ‍ॅक्ट नुसार गुन्हे नोंद करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बिंदू नियमावलीमध्ये अनियमितता करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-१२-२०२५) :** (१) हे खरे नाही.

(२) होय. हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**धाराशिव-बीड-संभाजीनगर नवीन रेल्वे मार्गावर कळंब जंक्शन निश्चीत करण्याबाबत**

**(४२) १२८७८ (०९-१०-२०२५). डॉ.तानाजी सावंत (परांडा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धाराशिव-बीड-संभाजीनगर असा नविन रेल्वे मार्गाकरीता अंतिम सर्वेक्षण करण्यात आले असून कळंब रोड म्हणजे कसबे तडवळे येथे रेल्वे मार्गावरील सर्व गाडयांना थांबा देण्यात यावा म्हणून कळंब तालुका रेल्वे कृती समितीने केंद्रीय रेल्वे मंत्रालयाकडे पाठपुरावा करीत असल्याची बाब दिनांक १६ मे, २०२५ रोजी निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धाराशिव जिल्हयातील कळंब शहराला ऐतिहासिक महत्व असून या भागात रेल्वे मंत्रालयाची ५० एकर जमिन उपलब्ध आहे. या भागाची लोकसंख्या ४५ हजाराच्या वर असून येथे सरकारी व निमसरकारी कार्यालये तसेच लहानमोठ्या उद्योजकांचे उद्योग असल्यामुळे या भागातील कर्मचारी, शेतकरी व उद्योगाच्या विस्तारीकरणासाठी मोठा वाव निर्माण होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कळंब रेल्वे जंक्शन होण्याच्यादृष्टीने पोषक वातावरण असल्यामुळे शासनाकडून या बाबत केंद्रीय रेल्वे मंत्रालयाकडे पाठपुरावा करण्यात येणार आहे काय किंवा करण्याचे निश्चीत केलेले आहे काय,

(४) असल्यास, त्यानुषंगाने कळंब रेल्वे जंक्शन होण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक (०९-०२-२०२६) :** (१), (२) व (३) धाराशिव-बीड-संभाजीनगर (२४० कि.मी.) या नविन रेल्वे मार्गाकरीता FLS मंजूरी दिनांक १४.०२.२०२५ रोजी प्राप्त आहे. अद्याप संरेखन निश्चित झाले नसून सर्वेक्षणाचे काम सुरु आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**दर्यापूर (जि.अमरावती) शहरातील मुख्य मार्गावरील सराफा प्रतिष्ठानातील दुकान फोडून चोरट्यांनी लाखो रुपयाचा ऐवज चोरी केल्याबाबत**

**(४३) १२९२० (१९-०९-२०२५). श्री.गजानन लवटे (दर्यापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दर्यापूर (जि.अमरावती) शहरातील मुख्य मार्गावरील सराफा प्रतिष्ठानात दिनांक ९ मे २०२५ रोजी पहाटे चोरट्यांनी सराफा दुकान फोडून तब्बल ४५ लाख रुपये किमतीचा ऐवज लुटल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी दर्यापूर पोलीस स्थानकात तक्रार दाखल करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कार्यवाही करण्यासह नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०२-२०२६) :** (१) व (२) दिनांक ०८.०५.२०२५ ते ०९/०५/२०२५ च्या रात्री विष्वकर्मा ज्वेलर्स दुकानाचे अज्ञान चोरटयांनी शटर फोडुन आत प्रवेश केला व सोन्याचांदीचे दागीने नगदी रु. ५,५०,०००/- व सिसिटीव्ही डिव्हीआर असा एकुण रु. ७७,६९,५००/- चा माल चोरुन नेल्याबाबत पोलीस स्टेशन दर्यापुर येथे अप क्र २३४/२०२५ कलम ३०५ (अ), ३३१(४),३(५) बि.एन.एस प्रमाणे गुन्हाची नोंद केली आहे.

(३) सदर गुन्हयाच्या तपासात स्थानिक गुन्हे शाखा, अमरावती ग्रामीण यांनी सर्व ८ आरोपींना अटक केली आहे. आरोपीतांनी सदर गुन्हा केल्याची कबुली दिली असुन आरोपींकडुन गुन्हयात चोरी गेलेला किंमती मुद्देमाल गुन्हयात वापरलेले वाहन, शटर कट करायला वापरलेले साहीत्य टामी, कटर, चाबी, गुच्छा, नगदी रुपये असा एकुण १७,९८,००० रु. चा माल हस्तगत करण्यात आला आहे. आरोपींविरुध्द मा. न्यायालयात दिनांक १२.०८.२०२५ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## करमाळा (जि.सोलापूर) येथील शेतकऱ्यांना उजनी धरण व सिना कोळगाव जलाशय काठावरील शेतीपंपाची विद्युत जोडणी सोलार ऐवजी विद्युत ए.सी.पंपावरुन करुन देण्याबाबत

**(४४) १२९२६ (१९-०९-२०२५). श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा (जि.सोलापूर) येथील शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीपंपासाठी यापुर्वी महावितरणच्या विद्युत रोहीत्रातून ए.सी. वीज कनेक्शन देण्यात येत होते, परंतू ऊर्जा विभागाने शेतकऱ्यांच्या शेतीपंपासाठी सोलार डी.सी. पंप देण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून सदर निर्णयाच्या अनुषंगाने केवळ ७.५ एच.पी. मर्यादेपर्यंतच सोलार पंपाचे कनेक्शन देण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, करमाळा तालुक्यातील धरणग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतीपंपासाठी ७.५ एच.पी., १० एच.पी., १२.५ एच.पी. आणि १५ एच.पी. कनेक्शनची मागणी महावितरणकडे करण्यात आलेली असून, उजनी धरण व सिना कोळगाव जलाशय काठावरील शेतीपंपाची विद्युत कनेक्शन जोडणी सोलार डी.सी. पंपाऐवजी विद्युत ए.सी.पंपावरुन जोडणी करुन देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे माहे मे, २०२५ मध्ये लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.

शेतकऱ्यांना शेतीपंपासाठी १० एचपी मर्यादेपर्यंत सोलरपंप कनेक्शन देण्यात येत आहे.

(२) हे खरे आहे.

(३) नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय मार्फत वॉटर युजर असोसिएशन (WUA), शेतकरी उत्पादक संस्था (FPO), प्राथमिक कृषी पतसंस्था (PACS) किंवा क्लस्टर आधारित सिंचन प्रणालीमार्फत बसविण्यात येणाऱ्या कृषी सौरपंपासाठी ७.५ एचपी पेक्षा जास्त केंद्रीय वित्त सहाय्य (CFA) देण्याची तरतूद नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाद्वारे करण्यात आली आहे. उदा. ५ शेतकऱ्यांच्या गटाने ४० एचपी पंप बसविल्यास तो गट ३७.५ एच पी पर्यंत केंद्रीय वित्त सहाय्य (CFA) या गटास देण्यात येईल. अशा बाबतीत लघु जलसिंचन योजनेद्वारेही सोलर पंप कार्यान्वित करण्याबाबत केंद्रशासनाच्या सुचना आहेत व त्याची अमंलबजावणी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## करमाळा (जि.सोलापूर) येथील उपसा सिंचन योजनेच्या विद्युत देयकाचे प्रती युनिट आकारणी पुर्ववत करण्याबाबत

**(४५) १२९३२ (१९-०९-२०२५). श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करमाळा (जि.सोलापूर) येथील दहीगाव उपसा, सीना-कोळगाव, सिना माढा उपसा सिंचन योजनेच्या विद्युत देयकाचे प्रती युनिट १.१६ रुपये या सवलतीच्या दरात आकारणी करण्यात येत असतांना माहे एप्रिल, २०२५ पासून त्यात वाढ करुन ५.७८ रुपये प्रती युनिट इतक्या दराने आकारणी करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सिंचन योजनेच्या विद्युत देयकाचे प्रती युनिट आकारणी दर पूर्ववत करण्यात यावेत अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे माहे मे, २०२५ मध्ये लेखी निवेदनाव्दारे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२६) :** (१) हे अंशत: खरे आहे,

अतिउच्चदाब, उच्चदाब व लघुदाब उपसा जलसिंचन योजना ग्राहकांना शासन निर्णय दिनांक १३.०३.२०२४ नुसार लागू असलेल्या वीजदर सवलतीचा कालावधी हा मार्च-२०२५ अखेर संपुष्टात आल्यामुळे, सदर ग्राहकांना मा. महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या वीज दराप्रमाणे देयकाची आकारणी करण्यात आली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) शासन निर्णय दिनांक २२.०९.२०२५ अन्वये अतिउच्चदाब, उच्चदाब व लघुदाब उपसा जलसिंचन योजना ग्राहकांना देण्यात येणाऱ्या सवलतीचा कालावधी दिनांक ३१.०३.२०२७ पर्यंत वाढविण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने माहे सप्टेंबर-२०२५ पासून वीजदर सवलत तात्काळ लागू करण्यात आली असून, माहे एप्रिल-२०२५ ते ऑगस्ट-२०२५ मधील सवलतीच्या रक्कमेचा परतावा अंदाजे रु.२५३.६२ कोटी ग्राहकांस माहे ऑक्टोबर-२०२५ च्या देयकामध्ये अदा करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महावितरण कार्यालयाकडून बंद करण्यात आलेली १.३ टक्के डी.डी.एफ. योजना पूर्ववत सुरु करण्याबाबत

**(४६) १२९४१ (१९-०९-२०२५). श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महावितरण कार्यालयाकडून १.३ टक्के डी.डी.एफ. योजना बंद करण्यात आल्याने अनेक शेतकऱ्यांना वीज पुरवठा होत नसल्याने त्यांची सिंचनासाठी मोठी गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरणकडून बंद करण्यात आलेली १.३ टक्के डी.डी.एफ. योजना पुर्ववत सुरु करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक ३ मार्च, २०२५ रोजी संचालक संचलन, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., वांद्रे (पूर्व), मुंबई यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने सदर योजना पूर्ववत सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२६) :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र शासनाच्या सौर कृषीपंप धोरणा अन्वये कुसुम-बी व मागेल त्याला सौर कृषीपंप योजना अंतर्गत पैसे भरुन प्रलंबित असलेल्या कृषीपंप अर्जदारांना सौर कृषीपंप घेण्याकरीता आवाहन करण्यात आले असून, त्यांना प्राधान्याने सौर ऊर्जेव्दारे दिवसा वीज पुरवठा करण्यात येत आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सौर कृषीपंप धोरणान्वये कुसुम-बी व मागेल त्याला सौर कृषीपंप योजनेअंतर्गत पैसे भरुन प्रलंबित असलेल्या कृषीपंप अर्जदारांना सौर कृषीपंप घेण्याकरीता आवाहन करण्यात आले असून, त्यांना प्राधान्याने सौर ऊर्जेद्वारे वीज पुरवठा करण्यात येत आहे. सन २०२४-२५ या वर्षामध्ये एकूण ३८,९१४ कृषीपंपांना पारंपारिक पध्दतीने व २,१४,८४० कृषीपंपांना सौर उर्जेवर वीज जोडणी देण्यात आली आहे. तसेच, सन २०२५-२६ मध्ये दिनांक ०१.१२.२०२५ पर्यंत २,१२,४५५ कृषीपंपांना सौर उर्जेवर वीज जोडणी देण्यात आली आहे. महाराष्ट्रात सौर ऊर्जेवर एकूण ७,३६,०२५ कृषीपंप वीज जोडणी देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बरडटोली (ता.अर्जुनी-मोरगांव, जि.गोंदिया) येथील जि.प.प्राथमिक शाळेला लागून असलेले सिमेंट गोडाऊन व टाईल्स कारखाना हटविण्याबाबत

**(४७) १२९५४ (०९-१०-२०२५). श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बरडटोली (ता.अर्जुनी-मोरगांव, जि.गोंदिया) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला लागून असलेल्या सिमेंट गोडाऊन व टाईल्स कारखान्यामुळे मोठया प्रमाणावर प्रदूषण होऊन विद्यार्थ्यांना प्रदूषणाचा त्रास होत असल्याबाबत तहसिलदार यांच्याकडे माहे मे, २०२५ मध्ये स्थानिक नागरिकांनी लेखी तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळेला लागून असलेल्या एका बाजूस सिमेंटचे गोडाऊन व दुसऱ्या बाजूला निवासी प्रयोजनार्थ जागा असतांना उपविभागीय, अधिकारी यांनी वाणिज्य कारणासाठी मंजुरी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शालेय व्यवस्थापन समिती, पालक समिती, यांनी तहसिलदार, शिक्षणाधिकारी व जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रारी करुन देखील अद्याप याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांना प्रदूषणमुक्त करण्याकरीता सिमेंट गोडाऊन व टाईल्स कारखाना हटविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०२-२०२६) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

तहसिलदार, अर्जुनी-मोरगांव यांनी दिनांक०४/०६/२०२५ च्या पत्रान्वये तक्रार पुढील कार्यवाहीसाठी मुख्याधिकारी, नगर पंचायत अर्जुनी-मोरगाव यांचेकडे पाठविली आहे.

(४) उपविभागीय अधिकारी, अर्जुनी-मोरगाव यांच्याकडून प्राप्त दिनांक २४/०६/२०२५ रोजीच्या अहवालानुसार

मुख्याधिकारी, नगर पंचायत अर्जुनी-मोरगाव यांच्याकडून सदर सिमेंट गोडाऊन व टाईल्स कारखाना हटविण्याबाबत कार्यवाही सुरु असल्याचे कळविले आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर कारखाना संमतीपत्राविना चालू असल्यामुळे दिनांक २५/०६/२०२५ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

मुख्याधिकारी, नगरपंचायत, अर्जुनी मोरगाव यांच्या दिनांक २५/११/२०२५ रोजीच्या अहवालानुसार माहे मे, २०२५ पासुन गोडाऊनमध्ये सिमेंट ठेवणे बंद केल्याचे कारखानदाराने कळविले आहे.

तसेच मुख्याधिकारी, नगरपंचायत, अर्जुनी मोरगाव यांच्या दिनांक ०३/०२/२०२६ रोजीच्या अहवालानुसार प्रश्नाधिन ठिकाणी टाईल्स करखाना असल्याचे दिसून आले नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भोकर (जि.नांदेड) येथील देवस्थानाशी संबंधीत कामांना पर्यटन विकास योजनेअंतर्गत मंजूरी देण्याबाबत

**(४८) १३२५९ (०७-१०-२०२५). ॲड.श्रीजया चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापुरकर (देगलूर) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकर (जि.नांदेड) विधानसभा मतदार संघातील देवस्थानाशी संबंधीत कामांना पर्यटन विकास योजनेअंतर्गत मंजूरी देवून निधी देण्याची विनंती स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३१ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शंभूराज देसाई (०५-१२-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) प्रादेशिक पर्यटन विकास योजनेंतर्गत पर्यटन विभाग, शासन निर्णय दिनांक २८/१०/२०२५ अन्वये नांदेड जिल्ह्यातील भोकर मतदार संघातील मुदखेड, अर्धापूर, भोकर या तालुक्यातील रु.२००.०० लक्ष रकमेच्या कामास प्रशासकीय मान्यता देऊन रु.५०.०० लक्ष निधी वितरीत आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नांदेड जिल्ह्याच्या भोकर विधानसभा मतदार संघामध्ये विज पुरवठयाची समस्या दूर करण्यासाठी NSC योजने अंतर्गत निधी उपलब्ध करून देणेबाबत

**(४९) १३२६६ (०७-०८-२०२५). ॲड.श्रीजया चव्हाण (भोकर), श्री.जितेश अंतापुरकर (देगलूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्याच्या भोकर विधानसभा मतदार संघामध्ये वीजपुरवठ्याच्या समस्येचे निवारण करण्यासाठी NSC योजनेअंतर्गत रू.७०० लक्ष इतका निधी उपलब्ध करून देण्याची विनंती स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २६ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी लोकप्रतिनिधींनी केलेल्या विनंतीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०१-२०२६) :** (१) हे खरे आहे.
(२) महावितरण कंपनीमार्फत भोकर विभागास नवीन विद्युत पुरवठा (NSC) योजनेअंतर्गत आतापर्यंत ११.५७ कोटी रुपयांची रक्कम उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. दिनांक ०१ सप्टेंबर, २०२५ रोजी भोकर विभागाकडे १.०४ कोटी रुपयांची अर्थसंकल्पिय तरतूद शिल्लक आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील पोलीस कर्मचाऱ्यांसाठी**
**अद्ययावत इमारतीच्या गृह प्रकल्पाबाबत**

**(५०) १३६४४ (०८-०९-२०२५). श्री.समाधान आवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील पोलीस ठाण्यालगतच्या ब्रिटिशकालीन पोलीस वसाहतीच्या जागेवर पोलीस कर्मचाऱ्यांसाठी अद्ययावत इमारतीच्या गृह प्रकल्पाचे काम सुरू करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी पोलीस गृहनिर्माण प्रकल्पासाठी निधीची तरतूद करण्यासह गृह प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०१-२०२६) :** (१) होय.
(२) महाराष्ट्र शासन, गृह विभाग पत्र दिनांक ०७/०२/२०२३ व दिनांक ०८/०१/२०२४ अन्वये मान्यता दिलेल्या प्रकल्पाच्या बांधकामाकरिताच्या प्राधान्यक्रम यादीत पोलीस अधीक्षक, सोलापूर (ग्रामीण) यांचेकरीता पंढरपूर येथे शासकीय निवासस्थान बांधकामाचा समावेश आहे.

पोलीस अधीक्षक, सोलापूर (ग्रामीण) यांचेकरीता पंढरपूर येथे अधिकारी व अंमलदार यांचेकरीता १७५ निवासस्थाने बांधण्याचे कार्यारंभ आदेश दिनांक १५/१०/२०२४ रोजी देण्यात आले असून सद्यस्थितीला १७५ निवासस्थानांचे काम प्रगतीत आहे. सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात या प्रकल्पास निधी मागणी प्राप्त झाली असून निधी वितरण करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.